दैनिक

रुबाबदार राज्याचा, जबाबदार विचार...

# लक्ष महाराष्ट्र

नाशिक, नंदुरबार, धुळे, जळगाव येथून एकाचवेळी प्रकाशित.

▶ RNI No.MAHMAR/2019/79184

www.lakshamaharashtra.com | lakshamaha.dhule@gmail.com | lakshamaha.nsk@gmail.com

▶ धुळे-नंदुरबार-नाशिक आवृत्ती ▶ वर्ष ४ थे ▶ अंक : २६५ वा ▶ शुक्रवार दि. २१ जुलै २०२३ ▶ किंमत : २ रु. ▶ पृष्ठे : ६


## इर्शाळवाडीत १०० पेक्षा जास्त जणांचे प्राण वाचवले

**मुंबई ।** कोकणात पावसामुळे हाहाकार उडाला आहे. जोरदार पावसामुळे रायगडमधील खालापूर तालुक्यातील इर्शाळवाडी गावावर डोंगराचा काही भाग कोसळून अनेक कुटुंब ढिगाऱ्याखाली अडकले आहेत. बुधवारी रात्री १०.३० च्या सुमारास ही घटना घडली. ढिगाऱ्याखालून १०३ जणांना बाहेर काढण्यात बचाव पथकाला यश आले आहे. तर, आतापर्यंत १६ जणांचे मृतदेहही बाहेर काढण्यात आले आहेत. आणखी ६० हून अधिक जण ढिगाऱ्याखाली अडकल्याची भीती आहे. सध्या पावसामुळे बचावकार्य थांबवले आहे. ते शुक्रवारी पहाटे सुरू होणार असल्याचे समजते.

## न्यूज कॉलम

### चोरीप्रकरणी पाच जणांवर गुन्हा

**साक्री ।** तालुक्यातील जामदे शिवारात पाच जणांनी घरात शिरून रोकडसह १६ कोंबड्या असा २१ हजार ७७० रुपयांचा मुद्देमाल चोरून नेल्याची घटना १२ मेस रात्री साडेनऊच्या सुमारास घडली होती. याप्रकरणी न्यायालयाच्या आदेशावरून १७ जुलैला निजामपूर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद झाला. रमेश रवेश भोसले (रा.जामदे ता.साक्री) यांच्या फिर्यादीनुसार काही एक कारण नसताना १२ मेस रात्री लोंगी शिवसिंग पवार, शत्रुघ्न शिवसिंग पवार, दादू शत्रुघ्न पवार, शिवसिंग नवल पवार व दियाजी शत्रुघ्न पवार (सर्व रा. जामदे ता. साक्री) हे घरात शिरले. त्यांनी बेदम मारहाण केली. शिवसिंग पवार याने कोयत्याने कपाळावर वार करुन जखमी केले.

### सौर ऊर्जा प्रकल्पाचे साहित्य लांबवले

**धुळे ।** साक्री तालुक्यातील इंदवे शिवारात असलेल्या सौर ऊर्जा प्रकल्पाचे साहित्य चोरट्यांनी लांबवले. त्यात बॅटरी, प्लेट, चार्जर व इतर वस्तूंचा समावेश आहे. त्यांची एकत्रित किंमत ४३ हजार रुपये आहे. सुरक्षा कर्मचारी जगदीश थोरात यांच्या तक्रारीवरून निजामपूर पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पीएसआय अभिजित इंगळेंचा पत्रकार भवनात झाला जंगी सत्कार







**धुळे । सचिन बागुल**

धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष, जेष्ठ पत्रकार रवींद्र इंगळे यांचे सुपुत्र अभिजित इंगळे यांनी एमपीएससी परीक्षेत घवघवीत यश संपादन करून पीएसआय पदाला गवसणी घातली आहे. एका सर्वसामान्य कुटुंबातील पत्रकाराचा मुलगा पीएसआय होणे ही बाब पत्रकारसृष्टीला स्वाभाविकच अभिमानास्पद व गौरवाची आहे. या उदात्त भावनेतून धुळे जिल्हा मराठी पत्रकार संघाच्या वतीने पत्रकार भवनात गुरुवार दि. २० जुलै रोजी पीएसआय अभिजित इंगळे यांचा जाहीर सत्कार समारंभ मोठ्या दिमाखात पार पडला. कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी महापौर प्रतिभा चौधरी, जिल्हा पोलीस अधीक्षक संजय बारकुंड, भाजपचे नूतन शहर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपलकर, कार्यक्रमाचे अध्यक्ष जेष्ठ पत्रकार बापू ठाकूर, योगेंद्र जुनागडे, दिलीप विभांडीक, निखिल सूर्यवंशी, पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, चंद्रशेखर पाटील, मिलिंद बैसाणे, विद्यमान उपाध्यक्ष मनोज गर्दे व इतर मान्यवरांच्या हस्ते पुष्पहार देऊन पीएसआय अभिजित इंगळे यांचा जंगी सत्कार करण्यात आला.

पुष्पहारांचे ओझे एवढे मोठे झाले की त्यात अभिजित इंगळे अक्षरशः झाकले गेले होते. यावेळी अभिजीतच्या आईवडील आणि यूपीएससी परीक्षेची तयारी करीत असलेल्या बहिणीसह सर्व इंगळे कुटुंबीय उपस्थित होते. कार्यक्रमाला सेवानिवृत्त अभियंता विजय मंगळे, वंचितचे राज चव्हाण, संदेश भूमीचे प्रणेते आनंद सैंदाणे, प्रा. संप्रती बैसाणे, संजय अहिरे, जेष्ठ पत्रकार प्रा. मोहन मोरे, नरेश रावताला, आदेश कुलकर्णी, श्रीकृष्ण बेडसे, भाग्यश्री बैसाणे, पत्रकार संघाचे कोषाध्यक्ष अतुल पाटील, प्रांतिक प्रतिनिधी तुषार बाफना, कार्यकारिणी सदस्य प्रकाश शिरसाठ, पुरुषोत्तम पाटील, सुनील बैसाणे, आकाश सोनवणे, दीपक शिंदे, सोपान देसले, गोरख गर्दे, भास्कर फुलपगारे, सिद्धार्थ मोरे आदी पत्रकारांसह सामाजिक, राजकीय, शैक्षणिक, क्रीडा, सांस्कृतिक इत्यादी क्षेत्रातील मान्यवरांची उपस्थिती होती. पत्रकार संघाचे सचिव सचिन बागुल यांनी प्रास्ताविकातून कार्यक्रम आयोजनामागची भूमिका मांडली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन राकेश गाळणकर यांनी केले तर आभार मनोज गर्दे यांनी मानले. मान्यवरांसह इतर अनेकांच्या मनोगतांमुळे कार्यक्रम उत्तरोत्तर रंगत गेला.

### भारावून गेल्यानंतर एसपी संजय बारकुंड यांनी सांगितली स्वतःची 'स्टोरी'

**कार्यक्रमात भाषणाची सुरुवात करताना जिल्हा पोलीस अधीक्षक हे भावुक झाले. त्यांच्या भावना दाटून आल्या. मगल्या दोन दिवसांपासून मी प्रचंड तणावात आहे. पण इथे आल्यानंतर सर्वसाधारण माणसांमध्ये आल्यासारखे वाटत असून मन हलके होत आहे, एवढे बोलून एसपी बारकुंड दोन मिनिटे स्तब्ध झाले. त्यामुळे सभागृहातही पिन ड्रॉप सायलेन्स वातावरण निर्माण झाले. मग त्यानंतर एसपी बारकुंड यांनी भावुक होत बोलायला सुरुवात केली. आपल्या आयुष्यातील शिक्षणासह लहानपणापासूनचे विविध प्रसंग, आठवणींचे अनेक पदर उलगडत बारकुंड यांनी आपली जीवनगाथा प्रत्यक्ष सर्वांसमोर कथन केली. ते अपघाताने पोलीस खात्यात आले असे सांगून त्यांनी त्यांच्या शैक्षणिक टप्प्यातील विविध किस्से सांगितले. पीएसआय अभिजित इंगळे यांना शुभेच्छा देताना बारकुंड म्हणाले की, इथे बाप से बेटा सवाई आहे. मात्र बाप हा बापच असतो. म्हणूनच सत्कार जरी अभिजीतचा असला तरी सर्वजण रवींद्र इंगळेंचेच गुणगान गात आहेत. या गुणगानाची जाणीव कायम ठरवुन कुटुंबासाठी नेहमी अभिमानास्पद कामगिरी कर. मजे न नसते ललाटी, जे न करी तलाठी, ते करी लाठीफ असे सांगून तुझ्या हाती पोलिसांची लाठी आली आहे. तिचा सदुपयोग समाजाच्या भल्यासाठी कर असा सल्लाही बारकुंड यांनी पीएसआय अभिजित इंगळे यांना दिला.**

### ...यांनीही मनोगते व्यक्त केली

**कार्यक्रमात बोलणाऱ्यांची संख्या अधिक होती. प्रत्येकाला वाटत होते की आपण मनोगत व्यक्त करावे. महापौर प्रतिभा चौधरी, जेष्ठ पत्रकार बापू ठाकूर, योगेंद्र जुनागडे, दिलीप विभांडीक, निखिल सूर्यवंशी, पत्रकार संघाचे माजी अध्यक्ष रवींद्र इंगळे, चंद्रशेखर पाटील, मिलिंद बैसाणे, संदेश भूमीचे प्रणेते आनंद सैंदाणे, वंचित बहुजन आघाडीचे राज चव्हाण यांच्यासह अन्य मान्यवरांनी मनोगत व्यक्त करून पीएसआय अभिजित इंगळे यांना शुभेच्छा दिल्या. त्यानंतर अभिजित यांच्यावर पुष्पहारांच्या शुभेच्छांचा वर्षाव करण्यात आला. यावेळी अभिजितचे वडील रविंद्र इंगळे यांचे सर्वांनीच कौतुक केले.**

## निमाच्या माध्यमातून दिंडोरी तालुक्यात उद्योगांसाठी रेडकार्पेट : नितीन गवळी

### निमाच्या दिंडोरी कार्यालयाचे उद्घाटन



**नाशिक । प्रतिनिधी**

एमआयडीसीतर्फे दिंडोरी तालुक्यात आता झालेल्या भूसंपादनाच्या व्यतिरिक्त निमाच्या व अनेक उद्योजकांच्या मागणीवरून येणाऱ्या काळात उद्योगांसाठी मोठ्या प्रमाणात जागा संपादित करण्यात येणार असून त्याबाबत शासनाकडे सातत्याने पाठपुरावा सुरू आहे. जांबुटके येथे आदिवासी भागातील उद्योजकांना व लोकांना प्रोत्साहित करण्यासाठी विशेष एमआयडीसी होवू घातली आहे. अकराळे येथे एमआयडीसी मार्फत लवकरात-लवकर निमाच्या कार्यालयासाठी जागा उपलब्ध करून देण्यास उद्योग मंत्र्यांनी तत्वतः मान्यता दिली आहे. असे प्रतिपादन एमआयडीसीचे प्रादेशिक अधिकारी नितीन गवळी यांनी केले.

नाशिक इंडस्ट्रीज अँड मॅन्युफॅक्चरर्स असोसिएशन (निमा) च्या दिंडोरी कार्यालयाच्या उद्घाटनप्रसंगी प्रमुख पाहुणे गवळी बोलत होते. व्यासपीठावर निमाचे अध्यक्ष धनंजय बेळे, उपाध्यक्ष किशोर राठी, सचिव राजेंद्र अहिरे,.निमाचे माजी अध्यक्ष विवेक गोगटे, डी.जी. जोशी, अण्णासाहेब देशमुख, रमेश वैश्य, मनिष कोठारी, दिंडोरीचे पोलीस निरीक्षक पंढरीनाथ ढोकणे, उद्योजक आणि सेवानिवृत्त पोलीस अधिकारी चंद्रकांत बनकर, दिंडोरी कार्यालय उपससमितीचे चेअरमन नितीन वागस्कर, को चेअरमन योगेश पाटील, सदस्य माधवराव साळुंखे, एचएएलचे वरिष्ठ अधिकारी जावेद अली, उमेश कोठावदे, आयमाचे माजी अध्यक्ष ज्ञानेश्वर गोपाळे, वरूण तलवार, निमा कार्यालयासाठी तळेगाव येथे जागा उपलब्ध करून देणारे योगेश पाटील, विवेक पाटील आदी होते. निमा अध्यक्ष धनंजय बेळे व त्यांच्या टीमचे विशेष कौतुक केले. विधान परिषदेसाठी पदवीधर, शिक्षकांप्रमाणेच उद्योजकांचा ही मतदारसंघही हवा, अशी सूचनाही त्यांनी केली. कार्यक्रमास निमाचे खजिनदार विरल ठक्कर, निमा हाऊस कमिटी चेअरमन राजेंद्र वडनेरे, गोविंद झा, संजय सोनवणे, सतीश कोठारी, मनीष रावल, संदीप भदाणे, सुधीर बडगुजर, सचिन कंकरेज, नीलेश पटेल, किरण खाबिया, विश्वजीत निकम, किरण लोणे, मिलिंद इंगळे, रवी पुंडे, श्रीकांत पाटील, यश राठी, अखिल राठी, शशांक मनेरिकर, रवींद्र झोपे, संदीप जगताप, किरण शिंदे यांच्यासह नाशिक, सिन्नर, दिंडोरी तसेच जिल्ह्यातील उद्योजक उपस्थित होते.

## जैन धर्मगुरुंच्या अमानुष हत्येचा सकल जैन समाजतर्फे निषेध




**धुळे । प्रतिनिधी**

जैन धर्मिय गुरू आचार्य कामकुमारनंदीजी महाराज यांची कर्नाटक राज्यातील हिरगुडी आश्रम ता.चिकोडी, जि.बेळगांव येथे अमानुष हत्या करण्यात आली. या घटनेचा सकल जैन समाज, धुलिया संघटनेतर्फे जाहीर निषेध व्यक्त करण्यात आला असून दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी मागणी जिल्हा प्रशासनाला दिलेल्या निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, दि.५ जुलै रोजी जैन धर्मिय गुरू आचार्य कामकुमारनंदीजी महाराज यांची कर्नाटक राज्यातील हिरगुडी आश्रम ता.चिकोडी, जि.बेळगांव येथे अमानुष पध्दतीने हत्या करण्यात आली. त्यांच्या शरीराचे वेगवेगळे भाग करून त्याची विल्हेवाट लावण्याचा व पुरावा नष्ट करण्याचा प्रयत्न झाला. हत्येपुर्वी त्यांना इलेक्ट्रीक शॉक देण्यात आले तसेच कपड्याने त्यांचा गळा आवळून मारण्याचा प्रयत्न झाला. त्यात हत्यारे यशस्वी न झाल्याने त्यांच्या शरीराचे तुकडे करून विहीरत, बोअरवेलच्या खड्ड्यात टाकण्यात आले. सदर घटना निंदनीय असून माणुसकीला काळीमा फासणारी आहे. यातील दोषींवर कठोर कारवाई करण्यात यावे, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. दरम्यान, जिल्हाधिकारी कार्यालयावर जैन बांधवांचा मोर्चा धडकला. यावेळी हम जैन समाज अहिंसक है, कायर नही है..., जब तक सुरज चांद रहेगा, मुनियोंका सम्मान रहेंगा आदी बॅनर्स हातात घेवून घटनेतील आरोपींविरूध्द कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. सदर मोर्चात श्री वर्धमान स्थानकवासी श्रावक संघ, धुळे, श्री १००८ चंद्रप्रभु दिगंबर जैन मंदिर, धुळे, श्री भगवान शितलनाथ संस्थान, धुळे आणि श्री जैन श्वेतांबर तेरापंथी सभा, धुळे या संघटनांनी सहभाग नोंदविला होता.

## नाशिक-मुंबई महामार्ग संदर्भात उपमुख्यमंत्र्यांकडे होणार बैठक

### आ. देवयानी फरांदे यांच्या प्रयत्नांना यश



**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक-मुंबई महामार्गाच्या दुरवस्थेबाबत आ. प्रा. देवयानी फरांदे यांनी विधानसभेच्या सभागृहात आवाज उठवत रस्त्याचे निकृष्ट काम आणि दुरुस्तीत हलगर्जीपणा करणाऱ्या ठेकेदाराला ब्लॅक लिस्टमध्ये टाकण्याची मागणी केली. उपमुख्यमंत्र्यांकडेही यासंदर्भात बैठक बोलवावी अशी मागणी त्यांनी यावेळी केली. त्यास प्रतिसाद देत उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी लोकप्रतिनिधींची स्वतंत्र बैठक या विषयावर घेण्याची ग्वाही दिली.

विधानसभेच्या पावसाळी अधिवेशनात बोलताना आ. फरांदे म्हणाल्या की, नाशिक-मुंबई महामार्गाची सध्या अतिशय बिकट अवस्था झाली आहे. या महामार्गात केवळ खड्डे आणि खड्डेच असल्यामुळे येथून मार्गक्रमण करणे वाहन चालकांना जिकरीचे जाते. जवळपास २०० किलोमीटर इतक्या रस्त्यावर केवळ एक जेसीबी आणि पाच कर्मचारी काम करताना दिसतात. इतक्या हळुवार पद्धतीने खड्डे बुजवण्याचे काम सध्या सुरू आहे. संबंधित ठेकेदाराला ब्लॅकलिस्ट करावे आणि यासंदर्भात उपमुख्यमंत्र्यांनी लोकप्रतिनिधींची बैठक बोलवावी अशी मागणी आ. प्रा. फरांदे यांनी केली. त्यास प्रतिसाद देत विधानसभेचे अध्यक्ष राहुल नार्वेकर यांनी नियमानुसार कार्यवाही करण्याचे प्रशासनाला आदेश दिले आहेत.

दरम्यान, यासंदर्भात आ. फरांदे यांनी उपमुख्यमंत्री अजित पवार यांना देखील पत्र दिले. त्या अनुषंगाने येत्या काही दिवसातच नाशिक-मुंबई महामार्ग संदर्भात स्वतंत्र बैठक घेण्याची ग्वाही उपमुख्यमंत्री पवार यांनी यावेळी दिली.

## भारीच : 'बाईपण भारी देवा' बॉक्स ऑफिसवर सुसाट!

'प्रेक्षक मराठी चित्रपट बघायला सिनेमागृहात येत नाहीत'; या विधानाला 'बाईपण भारी देवा' सिनेमानं छेद दिला आहे. हिंदी सिनेमांना मागे टाकत 'बाईपण...'नं महिलांसह पुरुष प्रेक्षकांचीही मनं जिंकली आहेत. महाराष्ट्रासह परदेशातही या सिनेमानं बाजी मारली. बॉलिवूडला 'भारी' पडलेल्या या सिनेमाची गोष्ट...

'बाईपण भारी देवा' या सिनेमाच्या नावाप्रमाणेच महाराष्ट्रातील चित्रपटगृहं 'भारी' भरू लागली आहेत. या सिनेमाला महिला प्रेक्षक तुडुंब गर्दी करत असल्याचं चित्र सध्या मुंबई, ठाणे, पुण्यासह संपूर्ण महाराष्ट्रातील चित्रपटगृहात बघायला मिळतंय. प्रत्येक बाईने कुठल्या न कुठल्या पात्रात स्वतः ला शोधावं असं ते कथानक. शशीच्या भूमिकेतल्या आईच्या जीवाची होणारी तगमग, मातृत्वाचा पाळणा रिकामा राहिल्याने जयाच्या आयुष्यात आलेलं रिकामंपण, सासरी कलागुणांना वाव न मिळाल्यामुळे घर, ऑफिसमध्ये होणारी कुचंबना हसतमुखाने सहन करणारी साधना लग्नाचं बंधन तुटू नये म्हणून शर्थीचे प्रयत्न करताना स्वतःच आतून तुटून गेलेली पल्लवी ,श्रीमंतीचा रुबाब मिरवणाऱ्या केतकीला नशिबाने दाखवलेला नात्यातल्या श्रीमंतीचा आरसा, चारुची संसाराची दोन्ही चाकं एकटीच्याच खांद्यावर घेऊन ओढताना होणारी दमछाक अशी ती स्त्री जन्माची कहाणी एकदा का माहेरचा उंबरठा ओलांडलेली तिचं आयुष्य सासरच्या उंबरठ्याच्या आत कधी कैद होतं हे तिलाही कळत नसतं. ना तिच्या नशिबात बर्थडे नावाचा तो एक दिवस राखीव असतो ना एकच प्याला की जो प्राशन करून ती तिची दुःख क्षणभर विसरून जाऊ शकते. बाईच्या मनात काय चाललंय हे कळणं अवघड असतं पण केदारशिंदें यांना ते बहुधा चांगलंच समजलंय. थिएटरमध्ये हसत आत जाणाऱ्या रसिक प्रेक्षकांना अश्रूंनी पाणावलेल्या डोळ्यांनी बाहेर पाडण्याचं कसब त्यांना बरोबर जमलंय.





### चित्रपट खूपच आवडला

**चित्रपटातील सहा बहिणींची कथा मनाला खूपच भावणारी आहे. काही प्रसंगात डोळ्यात आसू आणि काही वेळा हासू आणणारा हा चित्रपट खूपच आवडला. आमच्या परिवारातील सर्व महिला सदस्यांनी एकाचवेळी हा चित्रपट पाहिला. तसेच सर्व महिलांनी हा चित्रपट नक्की पाहावा. - सुनीता सोनवणे**

### संस्कृती आणि आधुनिकता यांचा मेळ

**चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहणे सध्या बंदच केले होते. परंतु, कार्यालयातील सर्व महिला बाईपण भारी देवाचे गुणगान गाऊ लागल्याने उत्सुकता वाढली. तीन ते चार वर्षानंतर चित्रपटगृहात जाऊन चित्रपट पाहिला. हा चित्रपट पाहताना महिला काही वेळा साठी का असेना आपले दुःख क्षणभर विसरून जात आहेत. भावनाप्रधान असा हा चित्रपट मनोरंजक पध्दतीने मराठी संस्कृती आणि आधुनिकता यांचा मेळ घालण्यात यशस्वी झाला आहे. - चैताली पाटील**



शोध बातमी

पुरुषोत्तम पाटील

मुख्य उपसंपादक

मो.७०५७०१११२६

## कै. कोठारी नाट्यगृहासाठी पालकमंत्र्यांचे मुख्यमंत्र्यांना पत्र

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक येथे ७२० आसन व्यवस्था असलेले नविन नाटयगृह नाशिक महापालिकेने मंजुर केलेले आहे. या कामासाठी ५० टक्के रुक्कम नाशिक महापालिका व उर्वरित ५० टक्के रक्कम महाराष्ट्र शासनाकडून स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत प्राप्त होणार आहे. या नाट्यगृहासाठी ठरल्यानुसार महाराष्ट्र शासनाकडून स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत ५ कोटी रुपये निधी मंजुर झाला असून तो नाशिक महापालिकेस प्राप्त झालेला आहे.

नविन नाट्यगृह मंजुर झाले त्यावेळेस या कामाचे अंदाजपत्रकिय रक्कम १८ कोटी होती. नविन डीएसआर किंमतीप्रमाणे या कामाची अंदाजपत्रकिय रक्कम आता सुमारे ३५ कोटी रुपये झालेली आहे. हे काम सुरु होण्यासाठी महाराष्ट्र शासनाकडून स्थानिक विकास कार्यक्रमांतर्गत उर्वरित निधी महापालिकेकडे वर्ग करणेबाबत सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेत पत्र दिले आहे.

पालकमंत्र्यांनी पाठपुरावा केल्याने नाट्यक्षेत्रात समाधान व्यक्त केले असून या अधिवेशनात कोठारी नाट्यगृहाचा विषय मार्गी लागणार असा विश्वास नाट्यप्रेमींनी व्यक्त केला आहे.

# विरोधकांचे संमेलन!

देशात २०२४ मध्ये लोकसभेच्या निवडणुका होण्याची शक्यता डोळ्यांसमोर ठेऊन विरोधक जसे कामाला लागले आहेत, तसे केंद्रातील भाजप व मित्रपक्षही कामाला लागले आहेत. गेल्या नऊ वर्षांपासून भाजपच्या नेतृत्वाखाली देशाची सत्ता आहे. आता पुढे मोदी यांची एककल्ली सत्ता नको म्हणून सर्व विरोधक एकजुटीने प्रयत्न करताहेत. सोमवार आणि मंगळवारी कर्नाटकातील बंगळूरु शहरात देशातील २६ विरोधी पक्ष नेत्यांची बैठक झाली. राहुल गांधींपासून, सोनिया गांधी, शरद पवार, ममता बॅनर्जी, उद्धव ठाकरे, नितीशकुमार यांच्यासह दिल्लीचे मुख्यमंत्री अरविंद केजरीवाल अशा दिग्गज नेत्यांनी या बैठकीला हजेरी लावली होती. तत्पूर्वी बिहारमधील पाटणा येथे विरोधकांची बैठक झाली होती, तर पुढील बैठक मुंबईत होण्याची शक्यता आहे. आगामी लोकसभा निवडणुकीची रणनीती कशी असावी, कोणत्या प्रचाराचे मुद्दे असावेत यासह मोदींना सत्तेपासून दूर ठेवण्याचा एककलमी कार्यक्रम केवळ विरोधकांचा दिसतो आहे. कारण २०१४ पासून मोदी यांच्या हातात सत्ता आणि राजकारणाची सूत्रे असल्याने त्याला कोणत्याही परिस्थितीत सुरुंग लावायचा, असा विरोधकांचा डाव आहे; परंतु पंतप्रधान नरेन्द्र मोदी विरोधकांचा हा डाव यशस्वी होऊ देणार नाहीत, यासाठी भाजपची रणनीती आखण्याचे काम सुरू आहे. भाजपनेही मंगळवारी त्यांच्या मित्रपक्षांची बैठक नवी दिल्लीत बोलावली होती. या बैठकीला मोदी यांनी संबोधित केले. बंगळूरुतील विरोधकांची बैठक म्हणजे बेईमान लोकांचे संमेलन असे मोदी यांनी या बैठकीचे वर्णन केले. या लोकांना भ्रष्टाचाराची खूप आवड आहे. हे लोक घराणेशाहीचे समर्थक आहेत. तसेच हे लोक प्रथम कुटुंबासाठी काम करतात. कुटुंबावर आधारित पक्षाने देशाचा विकास केला नाही, असा हल्लाबोल मोदी यांनी करीत बंगालमध्ये झालेल्या पंचायत निवडणुकीत हिंसाचार झाला, पण हे पक्ष त्यावर काही बोलले नाहीत. दारू घोटाळ्यावरही हे पक्ष काही बोलत नाहीत, अशी टीकाही मोदी यांनी कालच्या एनडीएच्या बैठकीत केली. या उलट भारतात मजबूत सरकार असल्यामुळेच जगाचा भारतावरील विश्वास वाढला आहे. एनडीएने कायमच विरोधात असताना सकारात्मक राजकारण केले. आम्ही कधीच नकारात्मकतेचा मार्ग अवलंबला नाही. लोकशाहीसाठीचे प्रत्येक कर्तव्य पार पाडले. पण कधीही जनदेशाचा अवमान केला नाही, असे मोदी विरोधकांवर टीकास्त्र करताना विरोधी पक्ष फक्त त्यांच्या कामांना प्राधान्य देतात, ज्यामुळे केवळ त्यांचा आणि त्यांच्या कुटुंबाचा फायदा होतो. परिणामी देशाचा विकास होत नसल्याचे पंतप्रधान मोदी यांचे म्हणणे आहे. एवढ्यावरच मोदी थांबले नाहीत, तर २०२४ साली देशांतील जनतेने आपले सरकार परत आणण्याचा निर्णय घेतला आहे. अशा स्थितीत भारताच्या दुर्दशेला जबाबदार असलेले काही लोक आपली दुकाने खोलून बसली आहेत, असा आरोपही त्यांनी विरोधकांवर केला. थोडक्यात कोणतेच काम हातात शिल्लक नसल्याने आणि सत्तेच्या लालसेपोटी विरोधकांच्या कारवाया सुरू असल्याचे कालच्या विरोधकांच्या बैठकीवरून एकंदरीत दिसते. लोकसभेप्रमाणे विधानसभेच्याही निवडणुका महाराष्ट्रात पुढील वर्षी होण्याची शक्यता असून महाराष्ट्रातील शिवसेना, काँग्रेस पक्ष निवडणुकीच्या तयारीला लागले आहेत. यासाठी त्यांनी महाआघाडीची वज्रमूठ तयार केली. संभाजीनगर, नागपूर आदी ठिकाणी वज्रमूठच्या मोठ्या सभाही झाल्या. पण त्यालाही आता ग्रहण लागले आहे. महाआघाडीमधील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात फूट पडून अजित पवारांचा गट मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि भाजप यांच्या सरकारमध्ये सामील झाला. वज्रमुठीतील अजित पवार हा मोठा नेताच शिंदे - भाजपच्या गोटात जाऊन बसला. त्यामुळे विरोधकांची अर्धी हवा आताच निघून गेली आहे. शरद पवार यांच्या हातात केवळ १५ ते १६ आमदार उरले आहेत. शिवाय पवार स्वतःला अजूनही तरुण समजत असतील, पुन्हा नव्याने कामाला लागू असे जरी ते म्हणत असले तरी ती एक त्यांच्या पक्षासाठी समाधानाची बाब आहे, एवढेच म्हणता येईल. विरोधकांनी वज्रमूठ बनवली काय किंवा देशपातळीवर भाजपचा पराभव आणि मोदी यांना कितीही दूर ठेवण्याचा प्रयत्न केला तरी त्यांना ते शक्य होणार नाही, असा आत्मविश्वास पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना आहे.

# 'कार्लोस' युगाची नांदी!

यंदाच्या विम्बल्डन स्पर्धेत कार्लोस अल्कारेजचे विजेतेपद अनेक अर्थांनी अनोखे ठरले. अवघ्या वीस वर्षांच्या या स्पॅनिश टेनिसपटूने गेले दशकभर टेनिसविश्वावर अधिराज्य गाजवणाऱ्या नोवाक जोकोविचवर मात करत पहिलं-वहिलं विम्बल्डन विजेतेपद पटकावलं. हे विजेतेपद म्हणजे टेनिस विश्वातल्या कार्लोस अल्कराझ युगाची सुरुवात असल्याचं बोललं जात आहे. या जीगरबाज खेळाडूचा खास परिचय.

विम्बल्डन टेनिसमधल्या चार ग्रँड स्लॅम स्पर्धांपैकी सर्वात वलयांकित अशी स्पर्धा. आयुष्यात एकदा तरी विम्बल्डन जिंकण्याचं स्वप्न प्रत्येक टेनिसपटूने उराशी बाळगलेलं असतं. कार्लोस अल्कराझनेही हेच स्वप्न पाहिलं आणि वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षी प्रत्यक्षातही आणलं. यंदाच्या विम्बल्डन स्पर्धेच्या पुरुष एकेरीचं विजेतेपद कार्लोसने पटकावलं आणि लंडनच्या सेंटर कोर्टवर समर्थकांनी एकच जल्लोष केला. याला कारणही तसंच होतं. कार्लोसचा हा विजय साधासुधा नव्हता. त्याने गेले जवळपास दशकभर टेनिसविश्वावर अधिराज्य गाजवणाऱ्या नोवाक जोकोविचसारख्या तगड्या, अनेक वर्षं अजेय राहिलेल्या, प्रचंड अनुभवी आणि महान टेनिसपटूवर मात केली. विम्बल्डन स्पर्धेतल्या पुरुष एकेरीचा अंतिम सामना प्रचंड चुरशीचा ठरला. टेनिसच्या जागतिक क्रमवारीत अग्रमानांकित असणाऱ्या कार्लोससमोर द्वितीय मानांकित, अनुभवी जोकोविचचं आव्हान होतं. जोकोविचवर मात करणं निश्चितच सोपं नव्हतं. एकीकडे तरुण रक्ताचा, उत्साहाने सळसळणारा कार्लोस अल्कराझ होता, तर दुसरीकडे अनुभवसंपन्न जोकोविच. हा सामना 'याचि देही याचि डोळा' अनुभवण्यासाठी सेंटर कोर्टवर चाहत्यांनी प्रचंड गर्दी केली होती. सेंटर कोर्टवर इतिहास घडणार असल्याची चाहुल लागल्यामुळेच जणू या इतिहासाचे साक्षीदार होण्यासाठी प्रेक्षकही उत्सुक होते. पहिला सेट गमावल्यानंतरही कार्लोसने हार मानली नाही. तो निकराने लढत राहिला. त्यानंतरचे सलग दोन सेट कार्लोसने जिंकले. त्यानंतर चौथ्या सेटमध्ये जोकोविचने पुनरागमन केलं आणि सामना पाचव्या सेटपर्यंत गेला. कार्लोसने ६-४ अशा फरकाने हा सेट जिंकत विजेतेपद पटकावलं.

तब्बल साडेचार तास रंगलेला हा अंतिम सामना पाहताना जगभरातल्या टेनिस चाहत्यांच्या अंगावर रोमांच उभे राहिले. खुद्द कार्लोसनेही या विजयाचं वर्णन 'स्वप्नवत' या शब्दात केलं आहे. या विजयानंतर पुरुष टेनिसविश्वात बदलाचे वारे वाहू लागतील, असा आशावादही त्याने व्यक्त केला आहे. आपला विजय हा फेडरर, नदाल आणि जोकोविच यांच्यानंतरच्या नव्या युगाची नांदी असल्याचंही कार्लोसने म्हटलं आहे. २० वर्षांच्या आयुष्यात आपण असे अत्यंत मोजके क्षण अनुभवले. विम्बल्डन स्पर्धा जिंकणं हा आपल्या आयुष्यातला सर्वात आनंदाचा क्षण असल्याचं मनोगत त्याने व्यक्त केलं. कार्लोसच्या रूपात टेनिसविश्वात नव्या ताऱ्याचा उदय झाला आहे. २०१३ मध्ये अँडी मरेने जोकोविचला सेंटर कोर्टवर पराभूत केलं होतं. मात्र त्यानंतर जोकोविच नावाचं वादळ कोणालाही थोपवता आलं नव्हतं. आता तब्बल दहा वर्षांनंतर कार्लोस अल्कराझने हा पराक्रम करून दाखवला. एवढंच नाही, तर तो १९८५ नंतर विम्बल्डन स्पर्धा जिंकणारा सर्वात युवा खेळाडूही ठरला. १९८५ मध्ये बोरिस बेकरने वयाच्या सतराव्या वर्षी



ही स्पर्धा जिंकली होती. २००२ मध्ये हेविटने विल्बल्डन स्पर्धा जिंकली होती. त्यानंतरच्या २० वर्षांमध्ये फेडरर, नदाल, जोकोविच आणि अँडी मरे यांनीच ही स्पर्धा जिंकली. या चौघांव्यतिरिक्त विम्बल्डन जिंकणारा कार्लोस हा २००२ नंतरचा पहिलाच खेळाडू ठरला आहे. २०२२ मधली अमेरिकन ओपन स्पर्धा जिंकत कार्लोस अल्कराझने ग्रँडस्लॅम विजयाचा प्रारंभ केला होता. त्यानंतर या वर्षी त्याने सहा स्पर्धा जिंकल्या आहेत.

क्ले कोर्टवर अगदी सहज खेळणाऱ्या कार्लोसला ग्रास कोर्टची फारशी सवय नव्हती. पण आता तो या ग्रास कोर्टच्या प्रेमात पडला आहे. पाच सेटपर्यंत रंगलेल्या सामन्यात जोकोविचला हरवल्यानंतर त्याचा आत्मविश्वास अनेक पटींनी वाढला आहे. आता आपण जोकोविचला कुठेही हरवू शकतो, असं त्याने म्हटलं आहे. ५ मे २००३ रोजी स्पेनमधल्या छोट्या गावात जन्मलेल्या कार्लोस अल्कराझच्या घरातच टेनिस होतं. कार्लोसचे आजोबा आणि वडील टेनिस खेळायचे. त्यामुळे कार्लोस आणि त्याच्या तीन भावांची पावलं टेनिसकडे वळली नसती तरच नवल. त्यातच राफेल नदालमुळे स्पेनमध्ये टेनिसला वेगळं वलय प्राप्त झालं. राफेल नदाल अनेकांचा आयडॉल बनला. त्याच्या पावलावर पाऊल टाकत टेनिस खेळण्याचं स्वप्न अनेक तरुणांनी उराशी बाळगलं. कार्लोस अल्कराझ हा सुद्धा अशाच तरुणांपैकी एक. नदालने २००५ मध्ये पहिलं ग्रँडस्लॅम जिंकलं तेव्हा कार्लोस फक्त दोन वर्षांचा होता. टेनिस म्हणजे काय हेही त्याला तेव्हा कळत नसावं. त्यानंतर साधारण वर्षभरातच कार्लोसच्या हाती टेनिसची रॅकेट आली. चिमुकला कार्लोस टेनिसचे धडे गिरवू लागला आणि तिथूनच त्याच्या प्रवासाला सुरुवात झाली.

कार्लोसने लहान वयातच आयुष्याचं उद्दिष्ट ठरवलं होतं. मोठेपणी काय व्हायचं आहे आणि आपल्याला नेमकं काय करायचं आहे, हे त्याला माहीत होतं. भविष्यात नेमकं काय व्हायचं आहे याबाबतच्या मुला-मुलींच्या संकल्पना सातत्याने बदलत असतात. पण कार्लोसच्या बाबतीत असं झालं नाही. त्याने आपलं ध्येय निश्चित केलं होतं. कार्लोसला फक्त चांगला टेनिसपटू व्हायचं नव्हतं, तर सर्वोत्तम व्हायचं होतं. त्या दृष्टीने त्याचे प्रयत्न सुरू होते. तो एक, एक पाऊल पुढे टाकत राहिला, यशस्वी होत राहिला आणि आता विम्बल्डन विजयाच्या रूपात एक मोठं यश त्याच्या पदरात पडलं. त्यामुळे यानंतरच्या काळात एक नवा कार्लोस अल्कराझ पाहायला मिळेल, कार्लोसचा कायापालट झालेला असेल, अशी अपेक्षा चाहते व्यक्त करत आहेत. या प्रवासात कार्लोसला अनेकांची साथ लाभली. कार्लोसचे आजोबा आणि वडील उत्तम टेनिसपटू होते. पण त्यांना जागतिक टेनिसमध्ये ठसा उमटवता आला नाही. पैशांच्या अभावामुळे टेनिससारख्या श्रीमंत खेळात त्यांना पुढे जाता आलं नाही. पण कार्लोस सुदैवी ठरला. अल्कराझ दांपत्याच्या चार अपत्यांमध्ये दुसऱ्या क्रमांकाच्या कार्लोसला उद्योगपती अल्फांसो लोपेझ यांनी हेरलं. टेनिसप्रेमी असणाऱ्या लोपेझ यांनी कार्लोसला आर्थिक मदत देऊ केली. त्या बदल्यात कार्लोसने आपल्या शर्टवर त्यांच्या कंपनीचा लोगो मिरवला. आर्थिक पाठबळामुळे कार्लोसला लहान वयातच सर्वोत्तम प्रशिक्षकांकडून टेनिसचे धडे गिरवता आले. तसंच विविध स्पर्धांसाठी जगभरात फिरता आलं.

नंतरच्या काळातही कार्लोसला प्रायोजकत्व मिळत गेलं. २०१८ मध्ये कार्लोसच्या कारकिर्दीला कलाटणी मिळाली. ज्युआन कार्लोस फरेरोने कार्लोसला प्रशिक्षण देण्याचा निर्णय घेतला आणि त्याच्या टेनिसला नवी दिशा मिळाली. उमेदीच्या काळात कार्लोसने नदालला आपला आदर्श मानलं. नदालचं यश बघतच तो मोठा झाला. नदालप्रमाणेच कार्लोसलाही क्ले कोर्ट अधिक भावतं. नदालसोबत त्याची तुलनाही केली जाते. मात्र अशा पद्धतीच्या तुलनेला काहीच अर्थ नसतो. नदाल हा एकमेव आहे, असं कार्लोसने वयाच्या सोळाव्या वर्षी सांगितलं होतं. आपला खेळ रॉजर फेडररसारखा असला तरी आपल्याला राफेल नदालसारखं व्हायचं असल्याचंही त्याने म्हटलं होतं. यंदाच्या माद्रिद ओपन स्पर्धेत कार्लोसने पहिल्यांदाच आपल्या आदर्शाचा म्हणजे नदालचा पराभव केला. या पराभवानंतर नदालने कार्लोसचं तोंड भरून कौतुक केलं. स्पेनमध्ये अजून एका टेनिसपटूचा उदय होत असल्याचं बघून आनंद होत असल्याचं नदालने म्हटलं होतं. कार्लोससाठी अर्थातच ही मोठी पोहोचपावती होती. विम्बल्डन विजयानंतर कार्लोसचं प्रचंड कौतुक होत आहे, अगदी कमी कालावधीत त्याने त्याचा खेळ उंचावला आहे. टेनिसच्या जागतिक क्रमवारीत आज तो अग्रमानांकित आहे. अवघ्या दोन वर्षांपूर्वी त्याने टेनिसच्या जागतिक क्रमवारीत पहिल्या १०० खेळाडूंमध्ये स्थान पटकावलं होतं. त्याआधी तो एटीपी स्पर्धांच्या अंतिम फेरीपर्यंतही पोहोचू शकला नव्हता. पण फक्त २४ महिन्यांमध्ये परिस्थिती पूर्णपणे बदलली. आज कार्लोसच्या नावे १२ अजिंक्यपदं आहेत. त्यात दोन ग्रँडस्लॅम स्पर्धांचा समावेश आहे. वयाच्या अवघ्या विसाव्या वर्षीही कार्लोस खूपच समंजसपणा दाखवतो. तारुण्याचा जोश असला तरी तो शांत डोक्याने खेळतो आणि म्हणूनच विपरित परिस्थितीतही तो डगमगत नाही. चुकांमधून शिकण्याची त्याची वृत्ती आहे. कार्लोसच्या खेळात फेडरर, नदाल आणि जोकोविच यांच्या खेळाचा संगम असल्याचं जाणकारांचं म्हणणं आहे. वय कार्लोसच्या बाजूने आहे. नुकतीच त्याच्या कारकिर्दीची सुरुवात झाली आहे. त्याला अजून खूप पुढे जायचं आहे. अनेक स्पर्धा जिंकायच्या आहेत. कार्लोस अल्कराझ टेनिस विश्वात नवं युग आणणार का, तो टेनिसविश्वाचं भवितव्य ठरणार का? आणि फेडरर, नदाल, जोकोविचचा वारसा चालवणार का? हे पाहणं निश्चितच उत्सुकतेचं ठरणार आहे.

# 'ग्रीन कोर्ट' आणि 'ई कोर्ट' चे कवित्व


कोरोनाच्या काळात तंत्रज्ञानाचा अधिक वापर कसा करता येईल याबद्दल न्यायालयांनी बरीच सुधारणात्मक पावले उचलली होती. अंदाजानुसार, कोविड निर्बंधांदरम्यान देशभरातील न्यायालयांनी दोन कोटींहून अधिक प्रकरणात आभासी सुनावणी घेतली. न्या. चंद्रचूड यांनी एका कार्यक्रमात सांगितले की, कोरोनाच्या काळात आभासी न्यायालयांच्या प्रणालीमुळे कामकाजात बरेच बदल आणि सुधारणा झाल्या आहेत. कोरोना संपल्यानंतर मात्र उच्च न्यायालय आणि काही राज्यांमधील अन्य न्यायालयांनी ही व्यवस्था काढून टाकली आहे, ही दुर्दैवाची बाब आहे. न्या. चंद्रचूड यांनी असे व्हायला नको होते, असे म्हणत चिंता व्यक्त केली होती.

पेपरलेस न्यायालये यापूर्वीच सुरू झाली होती. देशातील पहिले 'ई-कोर्ट' २०१६ मध्ये हैदराबादमध्ये सुरू झाले. इतर अनेक राज्यांमध्येही पेपरलेस न्यायालये स्थापन करण्याच्या दिशेने निश्चितपणे काम केले गेले आहे; परंतु त्याची संख्या आणि कामाचे प्रमाण वाढवायला हवे. न्यायालयांमधील खटल्यांचा अनुशेष कमी करण्याच्या दिशेने 'ई-कोर्ट'हा एक चांगला उपक्रम ठरू शकतो. न्यायालयीन कामकाजात सहभागी सर्व पक्षकारांचा वेळ आणि कायदेशीर खर्च वाचणार आहे. ही संपूर्ण प्रक्रिया पारदर्शक बनवण्याचे काम डिजिटल तंत्रज्ञान करते हेही खरे आहे. सर्वात महत्त्वाचे म्हणजे पेपरलेस सुनावणीमुळे कोट्यवधी कागदपत्रांची बचत होणार आहे. त्यामुळे आपोआप पर्यावरणरक्षण होईल. न्यायालये आणि पेपरलेस न्यायालयांमधील ऑनलाइन सुनावणीचे सकारात्मक परिणाम दुर्लक्षित करता कामा नयेत. केवळ संबंधित पक्ष तांत्रिकदृष्ट्या जाणकार नसून त्यांना त्यांच्या भाषेत निर्णयही उपलब्ध करून दिल्यास पेपरलेस न्यायालयाची संकल्पना अधिक प्रभावी ठरेल. या दिशेनेही आवश्यक त्या उपाययोजना कराव्या लागतील. एव्हाना नावीन्यपूर्ण डिजिटल उपक्रमांना गती देण्याची वेळ आली आहे. कायदेशीर प्रक्रियेचे डिजिटायझेशन आणि 'ई-कोर्टा'च्या स्थापनेद्वारे न्याय मिळवण्याचे लोकशाहीकरण कायदेशीर प्रणालीमध्ये ऑनलाइन प्रवेश आणि प्रकरणांची आभासी सुनावणी सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील लोकांसाठी सुलभ आणि परवडणारी न्यायव्यवस्था सुनिश्चित करण्यास मदत करते. केंद्र सरकारने २००७ मध्ये जिल्हा आणि अधीनस्थ न्यायालयांच्या संगणकीकरणासाठी 'ई-कोर्ट मिशन मोड' प्रकल्प सुरू केला होता. 'ई-कोर्ट' प्रकल्पाचे नियोजन, धोरण आणि अंमलबजावणीची जबाबदारी सर्वोच्च न्यायालयाच्या 'ई-कोर्टा'ची आहे. त्यासाठी सरन्यायाधीशांच्या अध्यक्षतेखाली समिती नियुक्त केली होती. खटल्यांच्या व्हीडिओ कॉन्फरन्सिंगच्या आचरणात एकसमानता आणि मानकीकरण आणण्याच्या दृष्टिकोनातून सर्वोच्च न्यायालयाने ६ एप्रिल २०२० रोजी एक सर्वसमावेशक आदेश दिला. त्यात व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे न्यायालयीन सुनावणीला कायदेशीर पवित्रता आणि वैधता प्रदान केली गेली. न्यायाधीशांच्या खंडपीठाने बनवलेले व्हीडिओ कॉन्फरन्सिंगचे नियम सर्व उच्च न्यायालयांना स्थानिक संदर्भासह उपयोगासाठी पाठवण्यात आले. माहिती, शिक्षण आणि संप्रेषण (आईसी) मोहिमेचा एक भाग म्हणून न्यायिक अधिकारी, वकील आणि जनतेला शिक्षित करण्यासाठी अनेक उपक्रम हाती घेण्यात आले आहेत. सर्वोच्च न्यायालयाच्या ई-समितीने माहिती तंत्रज्ञानावर प्रशिक्षण आणि जागरूकता कार्यक्रम आयोजित केले आहेत. त्यात राज्यांचे न्यायाधीश, न्यायालय कर्मचारी आणि वकिलांसह अंदाजे पाच लाख १३ हजार ८० लोकांचा समावेश आहे. ऑनलाइन प्रवेश आणि प्रकरणांची आभासी सुनावणी सामाजिक आणि आर्थिकदृष्ट्या मागासलेल्या वर्गातील लोकांसाठी सुलभ आणि परवडणारी न्यायव्यवस्था सुनिश्चित करण्यात मदत करते.

जिल्हा आणि अधीनस्थ न्यायालयांच्या संगणकीकरणासाठी केंद्र सरकारने २००७ मध्ये 'ई-कोर्ट मिशन मोड' प्रकल्प सुरू केला होता. तंत्रज्ञानाचा वापर करून न्याय मिळवून देणे हे या प्रकल्पाचे उद्दिष्ट होते. हा प्रकल्प भारताच्या सर्वोच्च न्यायालयाच्या ई-समिती आणि न्याय विभागाच्या सहकार्याने राबवण्यात येत आहे. प्रकल्पाचा पहिला टप्पा २०११-२०१५ दरम्यान राबवण्यात आला आणि दुसरा टप्पा २०१५ मध्ये सुरू झाला. त्यात आतापर्यंत १८ हजार ७३५ जिल्हा आणि अधीनस्थ न्यायालये संगणकीकृत करण्यात आली आहेत. प्रगत वैशिष्ट्यांसह कायदेशीर कागदपत्रांच्या इलेक्ट्रॉनिक फाइलिंगसाठी नवीन ई-फायलिंग प्रणाली सुरू करण्यात आली आहे. ई-फायलिंग नियमांचा मसुदा तयार करण्यात आला आहे आणि दत्तक घेण्यासाठी देशातील उच्च न्यायालयांना पाठवण्यात आला आहे. या सर्व प्रकारामुळे न्यायालयीन कारभारात गती येणार आहे. न्यायाला विलंब म्हणजे न्याय नाकारणे असे सांगत होणार्या तक्रारी आता दूर व्हायला हरकत नाही.

**संपूर्ण**

## शब्दकोडे-१२६



**आडवे शब्द**

१. सुंदर पती-पत्नीचा जोडा ५. हार ८. काळे ज्वालाग्रही खनिज ११. मऊ, मृदू ११अ. दारुचा एक प्रकार १२. यजमान, पती १४. रक्षण करणारा १५. बाजार १६. पावसाची झड १७. पापणी न हलवता (पाहणे) १९. सरपणाचे दुकान २१. संत रामदासस्वामी यांनी रचलेला ग्रंथ २४. जोम, मस्ती २५. अवस्था, दशा २७. पंख २८. तुरुंग २९. काठाच्या नक्षीप्रकारामुळे प्रसिद्ध धोतरप्रकार ---- काठी ३१. वर्ष ३२. अडकित्याने कातरण्याचे विड्यात घातले जाणारे फळ ३४. हळद पिऊन का अशी होता येणार? ३५. कागदावर आखलेला कप्पा ३७. आचारी ३९. माफी मागणारा ४२. दिवाणखाना ४३. सत्य ४४. अतिरेक, टोक ४५. मोठे गाव ४७. मातापिता ५१. कुटी ५२. कागदाचे एक परिमाण ५३. ढीग, चळत ५४. शाळेतील शिक्षिका ५५. केस काळे करण्याचे साधन ५७. वेल ५९. समुद्र ६१. विनोबाजींच्या गीतेवरील ओव्या ६३. लढताना मृत्यू येणे ६५. अखंड ६६. दुष्ट ६७. स्त्री ६८. रोखलेली नजर ६९. शेळी ७१. मैत्रीण ७२. ठराविक पैसे ७४. पायंडा, पद्धत ७६. दरोडा ७८. धोकादायक ८०. माणूस ८२. सूर्याचे एक नाव ८४. सटकन, पटकन ८५. मातीचा कण ८६. दुसऱ्यासाठी केलेला खर्च

**उभे शब्द**

१. रत्नजडित माळ २. अंतःकरण ३. किंमत ४. नमन ५. मागील अंगणाचा दरवाजा ६. मीठ ७. अरण्य ८. नवाकोरा ९. रेचक १०. एक पालेभाजी १३. दरारा, इभ्रत, वजन १८. सुसर २०. जनगणना २२. नरमांजर २३. पृथ्वी २५. भूतकाळ २६. चिंतन २७. परीक्षा घेणारा ३०. आशीर्वाद देणारी ३१. मित्र ३३. प्रयत्न ३६. बेकरीतील एक गोड पदार्थ ३८. पहाटेची गाढ निद्रा ४०. तुळशीमाळ धारण करणारा ४१. पार्थिवावरचे वस्त्र ४५. यमपुरी ४६. घरातील मोठी माणसे ४८. घाबरणे ४९. एक बारीक धान्य ५०. पायाचे उभे हाड ५४. स्त्रीलंपट ५६. चकचकीत, स्वच्छ ५८. चांदणी ५९. भेग, चीर ६०. किल्लेदार ६२. दिवसाचा चोविसावा भाग ६४. धनुष्यबाण ६५. अफूचे बी ६७. पूर्ण नेस्तनाबूत ६९. भाजपची विद्यार्थी संघटना ७०. ज्ञाती ७३. विचारांचे, भावनांचे इंद्रिय ७५. होडी ७७. वसन, वस्त्र ७९. बशीचा जोडीदार ८१. नवरामुलगा ८३. तीक्ष्ण नजरेचा पक्षी

## शब्दकोडे १२५ चे उत्तर

**आडवे उत्तर**

१.केसरी ३.मारा ६.करविर ७.खा खा ८.वर ९.राघवदास लाडू १०.सदन ११.डाकाईत १२.विरजण १४.साप १६.कसदार १८.लवाजमा २१.परतजाब २४.रमा २५.गारवा २७.दावेदार २८.दारू २९.परोपकार ३०.चलन ३२.नायनाट ३३.उपकार ३५.नित्यनेमाने ३८.घात ४०.यमक ४१.कविता ४४.लहानसहान ४७.लाज ४९.मळमळ ५१.लाडका ५२.कोयता ५५.कानवला ५८.मरमर ५९.बक ६१.घंटानाद ६२.रातबिरात ६४.आटा ६५.चहाफराळ ६६.झांज ६७.नरवर ६८.रमारमण

**उभे उत्तर**

१.केवडा २.सरकार ३.माघ ४.रावण ५.खसखस ६.कडू ६अ.विवर ७.खाद ७अ.खानसामा ९.रातसार १०.सणवार १३.जल १५.पत १६.कबर १७.रक्तदान १९.जमादार २०.कुलूप २१.परोपरीने २२.जागा २३.अंदाजपत्रक २६.वाचनालय ३१.लट ३४.अंतराळ ३५.निकाल लावणे ३६.मानस ३७.नकलाकार ३९.धनको ४२.विमला ४३.ताळ ४५.हाड ४६.नकारघंटा ४८.जन ५०.मकबरा ५३.यम ५४.तारणहार५६.वस्तरा ५७.सनातन ६०.कतरण ६३.बिगर ६४.आज ६५.चव ६५अ.रास

हे मराठी दैनिक मालक **विजय आत्माराम ठाकरे** यांनी मुद्रक-प्रकाशक-संपादक- चंद्रशेखर आत्माराम पाटील यांच्या पार्वती प्रिंटर्स-२, ई ११५/३, एम.आय.डी.सी., अवधान, धुळे (एम-५) येथे छापून, लक्ष महाराष्ट्र कार्यालय, बॉम्बे लॉज बिल्डींग, पहिला मजला, आग्रारोड धुळे येथून प्रकाशित केले.
**'लक्ष महाराष्ट्र' नाशिक कार्यालय** - फ्लॅट नं.१०, गंगा अपार्टमेंट, बोहरा पार्क, गंगापूर रोड, नाशिक-४२२००२ **मध्यवर्ती कार्यालय-** बॉम्बे लॉज बिल्डींग, दौलत म्युझिक सेंटरच्यावरती, पहिला मजला, आग्रारोड, धुळे. मो.९६६४३२५५५५ फोन नं. ०२५६२-३५६५७४.
**नंदुरबार कार्यालय** - शॉप नं. ११/१२, संत दगा महाराज कॉम्प्लेक्स, कोरीट नाका, नंदुरबार. **जळगाव कार्यालय** - बी विंग, रुम नं. ११ तिसरा मजला, गोलाणी मार्केट, जळगाव. E-mail: lakshamaha.dhule@gmail.com. (RNI No.MAHMAR/2019/79184)

# जैन मुनींच्या निर्घृण हत्येचा ठिकठिकाणी तीव्र निषेध

## सकल जैन संघटनेचे निवेदन

**नाशिक । प्रतिनिधी**



अलीकडे जैन मुनींवरील हल्याच्या घटना वारंवार घडत आहेत. नुकतीच कर्नाटकात चिक्कोडी जवळच्या हिराकोडी येथील दिगंबर जैन आचार्य मुनी कामकुमारनंदजी यांची निर्घृण हत्या करण्यात आली. या क्रूर, निर्दयी घटनेचा श्री जैन सेवा संघ व सकल जैन समाजातर्फे तीव्र निषेध करण्यात आला. काल (दि.२०) जिल्हाधिकारी कार्यालयात निवेदन देण्यात आले. त्यामध्ये अशा संवेदनशील घटनांची शासनाने गंभीर दखल घेऊन संबंधित गुन्हेगारांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली.

जैन समाज शांतताप्रिय असून जैन साधू - मुनी शांततापूर्ण आत्मसाधना करून विश्वशांतीचा पुरस्कार करतात. कोणत्याही वादविवादात किंवा समाजविघातक कृत्यांना पाठिंबा न देता सातत्याने सर्व समाज हिताची कामे केली जातात. अन्याय सहन न करता जैन समाज अल्पसंख्याक असूनही आत्मसन्मान जपतो. मात्र तरीही होणारे हे हल्ले क्लेशदायक आहेत. या व अशा घटनांचा तीव्र निषेध असून हल्लेखोरांना त्वरित अटक करून दोषींवर कठोर कारवाई करावी म्हणजे यापुढे या घटना न घडता त्यांना पायबंद बसेल असे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.

निवासी उप जिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांनी निवेदन स्वीकारून उचित कार्यवाही करण्याचे निर्देश दिले. नंतर असेच निवेदन पोलीस आयुक्त अंकुश शिंदे यांनाही देण्यात आले. निवेदनावर सकल जैन समाजातर्फे सचिन गांग, महेश शाह, पवन पाटणी, सुमेरकुमार काले, जयेश शाह, जवरीलाल भंडारी, मोहनलाल लोढा, महेंद्र बोरा, अभय कटारिया, अनिल गंगवाल, संदीप पहाडे, अशोक पाटणी, सोनल दगडे, सुवर्णा काले यांच्या स्वाक्षरी असून हे सर्वजण निवेदन देण्यासाठी उपस्थित होते.

## लासलगावला विराट निषेध मुकमोर्चा

**लासलगाव । प्रतिनिधी**



जैन समाजाचे तपस्वी गुरूदेव आचार्य श्री कामकुमार नंदीजी महाराज यांच्या कर्नाकटातील आश्रमात घुसून समाजकंटकांनी त्यांची हत्या केल्याप्रकरणी लासलगाव येथील जैन समाज बांधवांनी गुरुवारी (दि.२०)या घटनेचा तीव्र शब्दात निषेध व्यक्त करून दोषींवर तत्काळ कारवाई करावी अशी मागणी केली आहे.

सकाळी येथील जैन उपाश्रय पासून लासलगाव पोलीस ठाण्यापर्यंत मूक मोर्चा काढून याबाबत चे निवेदन लासलगाव पोलीस ठाण्याचे सहा पोलीस निरीक्षक राहुल वाघ यांना देण्यात आले.कर्नाटकातील चिकोडी येथे जैन समाजाचे कामकुमार नंदीजी महाराजांची निर्दयपणे हत्या करण्यात आल्यानंतर देशभरात जैन बांधवांमध्ये संतापाची लाट उसळली आहे.त्या पार्श्वभूमीवर लासलगाव येथे सकल जैन समाजाच्या वतीने या घटनेचा तीव्र शब्दात निषेध केला.नागरिकांनी बारा वाजे पर्यंत आपली आस्थापने बंद ठेवत या घटनेचा निषेध केला. यावेळी संघपती नितिन जैन, महावीर दगडे, चंदनमल धाडीवाल, आनंद आब्बड, लासलगाव ग्रामपंचायत सरपंच जयदत्त होळकर, नाशिक मर्चंट बँकेचे संचालक प्रकाश दायमा,डी के जगताप,बाजार समितीचे उपसभापती गणेश डोमाडे,रवी होळकर, सचिन होळकर, बबनराव शिंदे, संतोष पलोड, अशोकनाना होळकर, अरविंद देसाई, पुरुषोत्तम चोथानी, अनंता सावंत, डॉ सुजित गुंजाळ, शिवा सुरासे, राजेंद्र चाफेकर, योगेश पाटील, शंतनू पाटील, प्रकाश पाटील, अमोल थोरे, विशाल पालवे, गणेश जोशी, जावेद शेख, संतोष पानगव्हाणे,भाऊसाहेब देवकाते, राजू राणा, वाल्मीकराव गायकवाड, बाळासाहेब होळकर, गोटू बकरे, संदीप उगले, महेंद्र हांडगे, राजेंद्र कराड, प्रवीण कदम, दत्ता पाटील, बाबा अमरनाथ सोशल ग्रुप चे कार्यकर्ते तसेच सकल जैन समाज यावेळी मोठ्या संख्येने उपस्थित होता.

## मानव उत्थान सेवा समितीद्वारे वृक्षारोपण मोहीम



**नाशिक । प्रतिनिधी**

सदगुरूदेव श्री सतपालजी महाराज प्रणीत मानव उत्थान सेवा समितीद्वारे वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. आठवडाभरात ठिकठिकाणी मिळून सुमारे साडेचार हजार रोपांची लागवड करण्यात आली. देशी रोपांची लागवड करून मानवधर्म प्रेमींना वृक्ष संवर्धनाची प्रतिज्ञा घेतली.

समितीच्या वतीने पावसाळ्याच्या पार्श्वभुमीवर देशभरात वृक्षारोपण मोहीम राबविण्यात येते. समितीच्या देशभरातील आश्रमांना वृक्ष लागवड आणि वृक्ष संवर्धनाचे निर्देश देण्यात आले आहेत. या पार्श्वभुमीवर नाशिकमधील श्री हंस कल्याण धाम आणि तपोवनातील सर्व धर्म मंदीराच्या वतीने शहरात आणि ग्रामीण भागातही आठवडाभर वृक्षारोपण मोहीम राबविण्यात आली. समितीच्या नाशिक प्रबंधक साध्वी हिराजी, साध्वी पंकजाजी, साध्वी मिथिलेशजी, महात्मा अनासक्तानंदजी यांच्या मार्गदर्शनात अनेक मानवधर्म प्रेमी या वृक्षारोपण मोहीमेत सहभागी झाले. चुंचाळे येथील घरकुलाजवळील टेकडीवर मानव उत्थान सेवा समिती आणि ग्रीन रिव्होल्युशन टीमच्या संयुक्त विद्यमाने वृक्षारोपण करण्यात आले.

फळांची तसेच औषधी वनस्पतींची मिळून १ हजार २७५ रोपे लावण्यात आली असून त्यांचे संवर्धन करण्यासाठी योगदान देण्याची प्रतिज्ञा मानवधर्म प्रेमींनी यावेळी घेतली. दिंडोरी तालुक्यातील रवळगाव, पळसे, ओझर येथेही वृक्षारोपन केल्याची माहिती समितीच्या वतीने देण्यात आली. ही वृक्षारोपण मोहीम राबविण्याकरीता डॉ. संदीप आहेर, डॉ. योगेश सदगिर, गौतम भंदुरे, विजय भंदुरे, उत्तम भंदुरे, कैलास खोडे, सच्चिदानंद गांगुर्डे, पारसी बाबा, प्रशांत कश्मीरे, विजय काठे, चेतन भंदुरे, ज्ञानेश्वर भंदुरे आदींनी परिश्रम घेतले.

## पुरवणी अर्थसंकल्पात मालेगाव बाह्य मतदार संघासाठी ३४ कोटी ६४ लक्ष रुपयांच्या भरीव निधीस मंजुरी

**नाशिक । प्रतिनिधी**

मालेगाव बाह्य मतदार संघाचे आमदार तथा नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी मतदार संघातील विकास कामांचा धडाका लावला असून विकासासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध झाला आहे. जुलै २०२३ मधील पावसाळी अधिवेशनात पुरवणी अर्थसंकल्पात मालेगाव बाह्य मतदार संघात ३४ कोटी ६४ लक्ष रुपयांच्या भरीव निधीस मंजुरी मिळाली असल्याची माहिती नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी दिली.

पुरवणी अर्थसंकल्पात मालेगाव बाह्य मधील कामांसाठी भरघोस निधी देण्यात आला आहे. त्यात प्रामुख्याने मालेगाव-येसगाव- मळगाव- साकुरी (नि) रस्ता रा.मा. ४५३ कि.मी. २/०० ते ३/०० मध्ये रस्त्याची काँक्रीटीकरणासह सुधारणा करणे. ता. मालेगाव (भाग- शालीमार हॉटेल ते चंदनपुरी) यासाठी ९.५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. रा.म.मा. ३ ते दसाने खडकी टोकडे अस्ताणे कौळाणे वागझरी रस्ता प्रजिमा क्र. १३१ कि.मी. ३/५०० ते ९/०० चे काँक्रीटीकरण करणे. ता. मालेगाव (भाग- दसाने ते खडकी) या कामासाठी १० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. रा.म.मा. ३ ते लोणवाडे दसाने मालेगाव कॅम्प सोयगाव टेहरे ते ५.५० व रा.म.मा. ३ ते कौळाणे रस्ता प्रजिमा १३७ कि.मी. ०८/०० ते ।०९/९०० मध्ये रस्त्याची काँक्रीटीकरणासहीत सुधारणा करणे. ता. मालेगाव (फुलेनगर ते वजिरखेडे) या कामासाठी ५.५० कोटी निधी मंजूर करण्यात आला. मालेगाव जि. नाशिक येथे ५ मंडळ अधिकारी व २६ तलाठी कार्यालय बांधकामासाठी ५.५० कोटींचा निधी मंजूर करण्यात आला आहे. ग्रामा-३ रस्ता कि.मी. ०/०० ते ३/५०० व पुल रा.मा. १९ पांडूरंग सिनबंद ते रा.मा. २० रस्ता कि.मी. २/७० व सी.डी. वर्क कि.मी. ०/८०० भिंतीचे काम करणे. ता. मालेगाव जि. नाशिक या कामासाठी ३ कोटींचा निधी मंजूर करण्यात आला.

गारेगाव ते कजवाडे रस्ता सुधारणा आणि ग्रामा १३ लहान पुलाचे बांधकाम करणे. ता. मालेगाव जि.नाशिक यासाठी १९९.६० लक्ष रुपयाचा कामांना मंजुरी देण्यात आली आहे. भरघोस निधी मंजूर झाल्याने दळण वळणासह प्रशासकीय कार्यालयांचा प्रश्न मार्गी लागणार आहे.

---

**ॲड. संतोष एस. केदार**
**निशाणी नं.६**

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. ज्युडि. मॅजि. सो. वर्ग १ धुळे यांचे कोर्टात**

**फौ. कि. अर्ज नं. ५९७/२०२३**

कैलास नथ्थु पाटील
उ.व. : ४३ वर्ष, कामधंदा-मजुरी
रा :- बुरझड, ता. जि. धुळे. ......अर्जदार
विरूध्द
म. ग्रामसेवक सो.,
ग्रामपंचायत कार्यालय, बुरझड, ता. जि. धुळे. ...सामनेवाला
(कैलास नथ्थु पाटील यांचा जन्म दि. ११/०१/१९९१)

ज्याआर्थी अर्जदाराने धुळे येथील मे. ज्युडी. मॅजिः वर्ग १ सो. धुळे दि. १४/०७/२०२३ रोजी फौ. कि. अर्ज. नं. ५९७ /२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी वरील अर्जदाराने जन्म मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ मधील कलम १३ (३) प्रमाणे कैलास नथ्थु पाटील याच्या जन्माची नोंद करणेबाबत धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौकशी दि. ०२/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. न्यायदडांधिकारी सो. प्रथम वर्ग कोर्ट नं. यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थी मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे काम काज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :-१९/०७/२०२३

**व.लिपीक** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.** **दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.**

---

**ॲड. गणेश मगन पवार, धुळे**
**निशाणी नं.६**

### जाहिर नोटीस

**धुळे येथिल मा. दिवाणी न्यायाधिश सो.व. स्तर यांचे न्यायालयात**

**दि. कि. अर्ज. क्र. ८७९/२०२३**

१) खातुन बुधन उर्फ बुढन खाटीक, उ. वय.:- ८२ वर्ष, धंदा :- घरकाम, रा. वडजाई, ता. जि. धुळे. २) युनुस बुढन खाटीक, उ. वय.: - ६० वर्ष, धंदा :- नोकरी, रा. ब्लॉक नं. १६, रूम नं. ४, पोलीस मुख्यालय, धुळे, ता. जि. धुळे. ३) भैय्या बुढन खाटीक, उ. वय.:- ५२ वर्ष, धंदा - मजुरी ४) असिफ बुढन खाटीक, उ. वय.:- ४५ वर्ष, धंदा :- मजुरी, ५) नसिम अजीज खाटीक, उ. वय.:- ५७ वर्ष, धंदा :- घरकाम ६) रहेमतुल्लाह बुढन खाटीक, उ. वय.:- ५५ वर्ष, धंदा, ७) मुमताज बुढन खाटीक, उ. वय.:- ४९ वर्ष, धंदा :- घरकाम ८) शहनाज बुढन खाटीक, उ. वय.:- ४० वर्ष, धंदा :- घरकाम, नं. ३ ते ८ सर्व रा. वडजाई, ता. जि. धुळे.

९) फिरोज इस्माईल खाटीक, उ. वय.:- ३९ वर्ष, धंदा :- मजुरी.१०) राजु इस्माईल खाटीक,उ. वय.:- ३७ वर्ष, धंदा- मजुरी.११) युसुफ इस्माईल खाटीक,उ. वय.: - ३५ वर्ष, धंदा :- मजुरी, नं. ९ ते ११ रा. साखर कारखाना भाडणे, पांझरा कान, साखर कारखाना, भाडणे, ता. साक्री, जि. धुळे.

१२) इमाम जब्बार खाटीक,उ. वय.:- ३५ वर्ष, धंदा :-मजुरी. १३) प्रविण जब्बार खाटीक, उ. वय.:- ३३ वर्ष, धंदा :- घरकाम. नं. १२ व १३ रा. शिरसोली प्र. नं., ता. जि. जळगाव. ..... अर्जदार

वि.
कोणीही नाही ....सामनेवाला
१. बुढन रमजान खाटीक (मयत)
मृत्यु दि. ३१/१०/२०१५
मृत्यु समयी पत्ता : वडजाई, ता. जि. धुळे
२. अशरफ बी इस्माईल खाटीक (मयत)
मृत्यु दि. २७/१२/२०१८
मृत्यु समयी पत्ता : सुयश हॉस्पीटल, नाशिक
३. इस्माईल बुरहान खाटीक (मयत)
मृत्यु दि. ०२/१२/२०२१
मृत्यु समयी पत्ता : नवकार नगर, साक्री, जि. धुळे
४. रूबीना उर्फ नजनाबी जब्बार खाटीक (मयत)
मृत्यु दि.०३/११/२०१४
मृत्यु समयी पत्ता : शिरसोली प्र. न. ता. जि. जळगाव.
५. जब्बार मुसा खाटीक (मयत)
मृत्यु दि. १४/०६/२०१५
मृत्यु समयी पत्ता : शिरसोली प्र. न, ता. जि. जळगाव
........ मयत

ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते १३ यांनी धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. क. स्तर यांचे न्यायालयात दि.१५/७/२०२३ रोजी दि.कि.अर्ज. नं.८७९/२०२३ चा अर्ज दाखल केलेला आहे. ज्याअर्थी अर्जदार नं. १ ते १३ हे बुढन रमजान खाटीक (मयत) यांचे कायदेशीर वारस असल्याने वारस दाखला हा शासकीय-निमशासकीय व इतर खाजगी कामासाठी आवश्यक असल्याने सदरहु वारस दाखला मिळणेसाठी धुळे येथील मे. न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.

त्याअर्थी मे. न्यायालयाने पुढील चौकशीचे कामकाज चालविणेकरता पुढील चौ. दि. ०२/०९/२०२३ ही निश्चित केली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतक, वारस, वगैरे संबंधीतांना कळविण्यात येते की, याबाबत काही वाद असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधिश सो. वरिष्ठ स्तर कोर्ट नं. ५ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी उपस्थित राहुन हरकत नोंदवावी त्याअर्थि मे. कोर्टाने दिलेल्या व निश्चित केलेल्या तारखे पर्यंत कोणाचीही काहीही हरकत आली नाही तर सदर अर्जाचे कामकाज पुर्ण करण्यात येईल त्यानंतर येणाऱ्या तक्रारीची कोणतीही दखल घेतली जाणार नाही.

ठिकाण :- धुळे
दिनांक :- १९/०७/२०२३ आदेशावरुन

**कामगिरी कारकून** (शिक्का) **अधिक्षक**
**मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.** **मे.दिवाणी न्यायालय सो.कोर्ट नं.**

---

प्रोसेस जमा **ॲड. श्री. प्रकाश डी. देवरे, साक्री**
**निशाणी नं.६**

### जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. २१०/२०२३**

रंजनाबाई संतोष सुर्यवंशी वै. ३,
उ.व.-४७, धंदा -काही नाही, राहणार- डुकरीपाडा, पो. धनेर, ता. साक्री, जि.धुळे ........अर्जदार
वि.
कोणीही नाही. .......सामनेवाला
मयत कै. संतोष काळु सुर्यवंशी (मृत्यू दिनांक-२९/०९/२०१८)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग सो., यांचे कोर्टात मुंबई वारस कायदा १८२७ चे खंड ८ अन्वये कै. संतोष काळु सुर्यवंशी यांचा वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. याकामी इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदरची जाहिर नोटीस काढण्यात आली असुन मयताचे कायदेशिर वारस पुढील प्रमाणे आहेत.

१. रंजनाबाई संतोष सुर्यवंशी, २.अंजना संतोष सुर्यवंशी,
३. वकेश संतोष सुर्यवंशी, ४. सापटीबाई काळु सुर्यवंशी,

त्याअर्थी जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मयत कै. संतोष काळु सुर्यवंशी यांचे कायदेशिर वारस घोषीत होवुन मिळणेसाठी, सरकारी व निमसरकारी कार्यालये, सिटी सर्वे, ग्रामपंचायत, महसुल कार्यालय, बॅकिंग तसेच सहकारी कार्यालयातील कामांसाठी वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) आवश्यक आहे. वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी पुढील चौकशी तारीख २९/०८/२०२३ रोजी साक्री येथील सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर तथा न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग सो., यांचे कोर्ट नं. २ या न्यायालयात सकाळी १०.३० वाजता स्वतः अगर वकिलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही, असे समजून याकामी योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ : साक्री
दिनांक : १८/०७/२०२३ आदेशावरुन

**क.लिपीक** (शिक्का) **सहायक अधिक्षक**
**सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री** **सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

प्रोसेस जमा **ॲड. श्री. प्रकाश डी. देवरे, साक्री**
**निशाणी नं.६**

### जाहिर नोटीस

**साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज क्र. २१२/२०२३**

श्रीमती. सुमनबाई जयवंतराव सुर्यवंशी वै. ४,
उ.व.-६६, धंदा - घरकाम, राहणार
कासारे, इंदिरानगर, नविनवस्ती, ता. साक्री, जि.धुळे ....... अर्जदार
वि.
कोणीही नाही. ..........सामनेवाला
मयत कै. जयवंतराव अर्जुनराव सुर्यवंशी
(मृत्यू दिनांक- २१/०८/२०२२)

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी साक्री येथील मे. सह. दिवाणी न्यायालय, क.स्तर तथा न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग सो., यांचे कोर्टात मुंबई वारस कायदा १८२७ चे खंड ८ अन्वये कै. जयवंतराव अर्जुनराव सुर्यवंशी यांचा वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) मिळण्यासाठी अर्ज दाखल केलेला आहे. याकामी इतर कोणाचा वारस हक्क असल्यास त्यांना सदरची जाहिर नोटीस काढण्यात आली असुन मयताचे कायदेशिर वारस पुढील प्रमाणे आहेत.

१. श्रीमती. सुमनबाई जयवंतराव सुर्यवंशी, २. श्री. निपीनचंद्र जयवंतराव सुर्यवंशी, ३. श्री. मुकेशचंद्र जयवंतराव सुर्यवंशी, ४. कृपालिनी जयवंतराव सुर्यवंशी उर्फ कृपालिनी मिलिंद मोरे, ५. मृणालिनी जयवंतराव सुर्यवंशी उर्फ मृणालिनी सचिन देठे,

त्याअर्थी जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की, मयत कै. जयवंतराव अर्जुनराव सुर्यवंशी यांचे कायदेशिर वारस घोषीत होवुन मिळणेसाठी, सरकारी व निमसरकारी कार्यालये, सिटी सर्वे, ग्रामपंचायत, महसुल कार्यालय, बॅकिंग तसेच सहकारी कार्यालयातील कामांसाठी वारस दाखला (हेअरशिप सर्टीफिकेट) आवश्यक आहे. वरील वारसांव्यतिरिक्त इतर कोणाचा काहीही हक्क व अधिकार असल्यास त्यांनी पुढील चौकशी तारीख २९/०८/२०२३ रोजी साक्री येथील सह. दिवाणी न्यायाधीश, क.स्तर तथा न्यायदंडाधिकारी, प्रथम वर्ग सो., यांचे कोर्ट नं. २ या न्यायालयात सकाळी १०.३० वाजता स्वत: अगर वकिलांमार्फत हजर रहावे. वरील प्रमाणे आपण करण्यास चुकलात तर आपली या अर्जाच्या कामी कोणत्याही प्रकारची काहीएक हरकत नाही, असे समजून याकामी योग्य तो आदेश पारित करण्यात येईल.

सदर जाहिर नोटीस कोर्टाच्या सहीशिक्क्यानिशी प्रसिध्दीस दिली असे.

स्थळ -साकी
दिनांक - १८/०७/२०२३ आदेशावरुन

**क.लिपीक** (शिक्का) **सहायक अधिक्षक**
**सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री** **सह. दिवाणी व फौजदारी न्यायालय, साक्री**

---

**प्रोसेस जमा** **ॲड. पांडुरंग आर. पीसे**
**निशाणी नं.६**

### जाहिर नोटीस

**धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश (व. स्तर) सो. यांचे कोर्टात**

**दिवाणी कि. अर्ज नं.८८२/२०२३**

श्री. योगेंद्रसिंग भगवानसिंग गिरासे
उ. व. ६७ वर्षे, धंदा- काहीनाही
रा. वेडु आप्पा चाळ, चितोड रोड,
धुळे, ता. जि.धुळे .......अर्जदार
वि.
कुणीही नाही ......सामनेवाला
कै. सरस्वतीबाई भगवानसिंग गिरासे (मयत)
बॉम्बे रेग्युलेशन कायदा VIII१८२७ चे कलम २ प्रमाणे
वारस दाखला (Legal Heirship Certificate) मिळणेकरीता अर्ज

ज्याअर्थी वरील अर्जदार यांनी मयत कै. सरस्वतीबाई भगवानसिंग गिरासे यांचे कायदेशिर वारस ठरवुन मिळणेकामी बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट कलम २ अन्वये वारस दाखला मिळणेकामी सदरचा दि.कि. अर्ज धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) कोर्ट नं.८ यांचे न्यायालयात दाखल केलेला आहे.

मे. न्यायालयाने सदर अर्जावर पुढील चौकशीचे कामकाज चालविणे करीता चौ. ता. दि. २४/०८/२०२३ ही निश्चित केलेली आहे. त्याअर्थी तमाम जनतेस, हितचिंतकास, वारसांना व इतर संबंधीतांना या जाहिर नोटीसीने कळविण्यात येते की, कोणास सदर अर्जाबाबत काही वाद, हरकत असल्यास धुळे येथील मे. दिवाणी न्यायाधीश सो. (क. स्तर) कोर्ट नं. ८ यांचे न्यायालयात उक्त निश्चित तारखेस वा तत्पुर्वी स्वतः किंवा वकीलांमार्फत हजर राहुन सदरकामी आपले म्हणणे, तक्रार, लेखी हरकत सादर करावी. त्याअर्थी मे. न्यायालयाने दिलेली व निश्चित केलेल्या तारखेपर्यंत कोणचीही तक्रार, लेखी हरकत न आल्यास सदरकामी कोणाची काहीएक हरकत नाही, असे गृहित धरण्यात येवून सदर अर्जाचे कामी चौकशी होवून वरील अर्जदार यांना मयत कै. सरस्वतीबाई भगवानसिंग गिरासे यांचे कायदेशिर वारस म्हणुन बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट अन्वये वारस दाखला (Legal Heirship Certificate) देण्याबाबत पुढील सुनावणी करण्यात येईल. त्यानंतर कोणाचीही, काहीएक हरकत ऐकुन घेतली जाणार नाही व ग्राहय धरण्यात येणार नाही, याची नोंद घ्यावी.

सदर जाहिर नोटीस मे. न्यायालयाचे सहीशिक्यानिशी प्रसिद्धीस दिली असे.

स्थळ : धुळे
दि. १९/०७/२०२३ आदेशावरुन

**व.लिपीक** (शिक्का) **अधिक्षक**
**दिवाणी न्यायालय, धुळे** **दिवाणी न्यायालय, धुळे**

## न्यूज कॉलम

### बांधावरून हाणामारी; गुन्हा दाखल

**धुळे ।** शेतात तालुक्यातील वाजदरे शिवारातील शेतात बांध कोरला आणि कचरा ठेवल्याचा जाब विचारण्याच्या कारणावरून हाणामारी झाली. ही घटना १६ जुलैला सकाळी घडली. याप्रकरणी वसंत किसन ठेलारी याच्या फिर्यादीवरून निजामपूर पोलिस ठाण्यात नऊ जणांविरूद्ध गुन्हा दाखल झाला.

### वाहनाच्या धडकेत बालकाचा मृत्यू

**धुळे ।** मुंबई-आग्रा महामार्गावरील लळिंग शिवारात बीएसएनएल टॉवरसमोरील गतिरोधकाजवळ भरधाव आयशरने दुचाकीला जोरदार धडक दिली. त्यात बालक ठार झाला. तसेच तीनजण जखमी झाले. येशीनाथ बुधा पाटील व दिलीप पंडित खैरनार दुचाकी (एमएच १८, बीपी १७४२)ने जात होते. त्यावेळी दुसऱ्या दुचाकीवर योगेश सुकदेव नेरकर, दीपाली योगेश नेरकर दोघे जात असताना भरधाव आयशरने (एमएच १८, बीजी ७३१३) दोघा दुचाकींना मागावून जोरदार धडक दिली. त्यात दिलीप खैरनार हा बालक गंभीर जखमी होऊन जागीच ठार झाला.

# आ.कुणाल पाटलांनी उठविला अधिवेशनात आवाज; कृषी मंत्र्यांकडून पंचनाम्याची ग्वाही

**धुळे । प्रतिनिधी**

**धुळे तालुक्यासह जिल्हयातील कपाशी पिकावर लाल्या रोगाचा प्रादुर्भाव जाणवू लागला आहे. लाल्या रोगामुळे शेतकर्यांच्या उत्पन्नात घट येणार असून त्यामुळे शेतकरी हवालदिल झाला आहे. म्हणून शासनाने तत्काळ लाल्या रोगाचा प्रादुर्भाव असलेल्या क्षेत्राचा पंचनामा करुन नुकसान भरपाई द्यावी अशी मागणी आ.कुणाल पाटील यांनी थेट विधानभवनात केली. दरम्यान आ.कुणाल पाटील यांनी मागणी केल्यानुसार कृषी विभागाला पंचनामा करण्याचे निर्देश दिले जातील अशी ग्वाही कृषी मंत्री ना.धनंजय मुंडे यांनी सभागृहात दिली.**



याबाबत सविस्तर वृत्त असे कि, धुळे ग्रामीणचे आ.कुणाल पाटील यांनी आज दि.१९ जुलै रोजी राज्याच्या पावसाळी अधिवेशनात पॉईंट ऑफ इन्फार्मेशनच्या माध्यमातून धुळे तालुका व जिल्ह्यातील कापूस पिकावरील लाल्या रोगामुळे नुकसान झालेल्या पिकाचा पंचनामा करुन नुकसान भरपाई मिळावी अशी मागणी करीत सभागृहात आवाज उठविला. सभागृहात बोलतांना आ.कुणाल पाटील म्हणाले कि, धुळे तालुका आणि जिल्हयात कापसाची सर्वाधिक लागवड केली जाते. यावर्षी उशिरा व कमी पावसामुळे शेतकर्यांची दयनीय अवस्था झाली आहे. कमी पावसाचा फटका कापूस पिकाला बसू लागला आहे. धुळे तालुक्यातील बहूतांश क्षेत्रावरील कापूस पिकावर लाल्या आणि मर रोगाचा प्रादूर्भाव जाणवू लागला आहे. लाल्या रोगामुळे कापूस पिकाची पाने लाल-पिवळी पडू लागली आहेत तर पानांचीही गळती सुरु झाली आहे. परिणामी उत्पन्नात घट येण्याची भिती शेतकरी वर्गात निर्माण झाली आहे. त्यामुळे लाल्या रोगाचा प्रादुर्भाव असलेल्या कापूस क्षेत्राचा पंचनामा करुन शेतकर्यांना नुकसान भरपाई देण्याची मागणी कृषी मंत्र्यांकडे आ.पाटील यांनी यावेळी केली.

### कृषी मंत्र्यांचे निर्देश

**आ.कुणाल पाटील यांनी सभागृहात मागणी केल्यानुसार कृषी मंत्री ना.धनंजय मुंडे यांनी कृषी विभागाला पंचनामा करण्याचे निर्देश दिले जातील. लाल्या रोगाचा प्रादूर्भाव झालेल्या कापूस क्षेत्राचा आढावा घेवून कृषी व महसूल विभाग एकत्र पंचनामा करतील. अशी माहिती सभागृहात बोलतांना कृषी मंत्री ना.धनंजय मुंडे यांनी दिली.**

## भाजप शहराध्यक्षपदी प्रशांत जाधवांची नियुक्ती

**नाशिक । प्रतिनिधी**



नाशिक भाजपामध्ये संघटनात्मक फेरबदल झाले असून नाशिक शहराध्यक्षपदी माजी नगरसेवक प्रशांत जाधव यांची नियुक्ती करण्यात आली आहे. तर ग्रामीण जिल्हाध्यक्षपदी सुनील बच्छाव आणि शंकर वाघ यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भाजप प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांनी नवी भाजपची टीम जाहीर करत पक्ष संघटना बळकट करण्याचा प्रयत्न चालवला असल्याचे स्पष्ट होते.

यापूर्वी नाशिक शहराध्यक्षपदी गिरीश पालवे होते. दरम्यान गेल्या विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर माजी आमदार बाळासाहेब सानप यांना विधानसभा निवडणुकीत उमेदवारी नाकारण्यात आल्यानंतर त्यांचे शहराध्यक्ष पद काढून घेण्यात आले होते. लागलीच गिरीश पालवे यांना यांना संधी देत त्यांना दोन वेळा मुदतवाढ देण्यात आली होती. मात्र गेल्या काही दिवसांपासून नाशिक शहराध्यक्ष बदलण्याच्या हालचाली सुरू होत्या, मात्र निर्णय घेतला जात नव्हता. काही दिवसापूर्वीच बावनकुळे यांनी संघटनात्मक बदल करण्यासंदर्भात नाशिकच्या लोकप्रतिनिधींशी चर्चा करत काल अखेर नाशिक शहराध्यक्षाची निवड जाहीर केली. प्रशांत जाधव यांनी भाजपा शहर कार्यकारणीमध्ये सलग दोन वेळा संघटन सरचिटणीस म्हणून काम केले आहे. तर २०१७ मध्ये त्यांची नाशिक महापालिकेत स्वीकृत सदस्यपदी नियुक्ती करण्यात आली होती. तर दुसरीकडे ग्रामीण भागातील जिल्हाध्यक्षांच्या नियुक्ती करण्यात आल्या आहे. सुनील बच्छाव आणि शंकर वाघ यांना संधी देऊन पक्षाने त्यांच्यावर जिल्हाध्यक्षपदाची जबाबदारी सोपवली आहे.

आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका पाहता भाजपाने मोठ्या प्रमाणावर राज्यस्तरीय संघटनात्मक फेरबदल केल्याने नव्या जोमाने नवी कार्यकारणी काम करेल अशी अपेक्षा पक्ष कार्यकर्त्यांकडून व्यक्त होत आहे.

## रोटरी विद्यार्थ्यांना देणार ५५५५ सायकल



### पहिल्या टप्प्यात ११०० वाटप

### प्रांतपाल आशा वेणुगोपाल यांचा पुढाकार

**नाशिक । प्रतिनिधी**

रोटरी ३०३० च्या नूतन प्रांतपाल आशा वेणुगोपाल यांनी कारकिर्दीच्या पहिल्याच दिवशी 'उडान' या संकल्पनेवर आधारित उपक्रमांतर्गत ११०० गरजू विद्यार्थ्यांना सायकल वाटप केल्यात. सातपूर औद्योगिक वसाहतीतील झेनिथ कारखान्यात झालेल्या कार्यक्रमप्रसंगी प्रातिनिधीक स्वरूपात विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत नाशिक ते नागपूरपर्यंत ५५५५ विद्यार्थ्यांना सायकलचे वाटप करण्यात येणार आहे.

या कार्यक्रमासाठी रोटरी ३०३० च्या नुतन प्रांतपाल आशा वेणूगोपाल, आ. सीमा हिरे, लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर, रोटरीचे माजी प्रांतपाल आनंद झुनझुनवाला, शब्बीर शाकीर, राजीव शर्मा, संग्रामसिंग भोसले, आगामी प्रांतपाल राजेंद्र खुराणा व्यासपिठावर होते.

'स्प्रेड ऑफ जॉय' ही संकल्पना बहुतांश प्रमाणात रोटरीच्या वतीने राबविण्यात येते. गरजवंतांच्या पंखात नेहमीच बळ भरणाऱ्या रोटरीच्या उपक्रमामुळे अनेकांचे जीवन आनंदीमय झाले आहे. आता शालेय विद्यार्थ्यांना उडान अंतर्गत सायकलच्या माध्यमातून केलेल्या मदतीमुळे त्यांच्या पंखात बळ भरले गेले असून भविष्यात निश्चितच ही मुले गरुड भरारी घेतील असा विश्वास लाचलूचपत प्रतिबंधक विभागाच्या अधीक्षक शर्मिष्ठा वालावलकर यांनी व्यक्त केला.

आ. सीमा हिरे यांनी समाजाची सेवा हेच रोटरी क्लबचे ब्रिद असल्याचे सांगितिले. आनंद झुनझुनवाला, शब्बीर शाकीर यांनी मनोगत व्यक्त करून उपक्रमाचे कौतुक केले. सूत्रसंचालन जयंत खैरनार यांनी केले. शहरातील २२ क्लबच्या संयुक्त समितीच्या वतीने सौमित्र दास यांनी आभार मानले. माजी स्थायी समिती सदस्य सलीम शेख यांच्यासह विविध शाळांचे शिक्षक, विद्यार्थी व पालक यावेळी उपस्थित होते.

### वेणुगोपाल यांचे भरीव योगदान

**फर्स्ट जंटलमन भास्करन वेणुगोपाल यांनी स्वत: सायकल खरेदीसाठी निम्मा खर्च रोटरीला दिला आहे. त्यामुळे त्यांचे या कार्यास भरीव योगदान मिळाले. त्यांचा यावेळी सत्कार करण्यात आला. यापुढेही सामाजिक कार्यास हातभार लावण्याची ग्वाही त्यांनी दिली.**

## गणोर येथे हैदोस घालणारा बिबट्या जेरबंद; एक मोकाट

**शहादा । प्रतिनिधी**

तालुक्यातील गणोर सात शेळ्यांचा फडशा पडणाऱ्या एका बिबट्याला वनविभागाने जेरबंद केले आहे. तर दुसऱ्या बिबट्याचे आव्हान कायम आहे.

गेल्या महिनाभरापासून तालुक्यातील गणोर व परिसरात तळ ठोकून बसलेल्या बिबट्याने पाळीव प्राणी तसेच भटक्या कुत्र्यांना लक्ष्य केले होते. परिसरात शेळ्यांची शिकार मिळत असल्याने बिबट्याने मुक्काम वाढविल्याचे दिसून येत असल्याने ग्रामस्थांमध्ये दहशतीचे वातावरण निर्माण झाले होते. वनविभागाने ठोस उपाय करून बिबट्याला जेरबंद करण्याची मागणी ग्रामस्थांनी केली होती.

महिनाभरापूर्वी बिबट्याने गणोर येथे केलेल्या हल्ल्यात बालिका जखमी झाली होती. नंतर एका शेळीला फस्त करण्यात आले होते तर दुसरीला जखमी केल्याची घटना घडली होती. त्यातच पुन्हा बिबट्याने गणोर येथील रामदास सुकलाल ठाकरे यांच्या घराशेजारी बांधण्यात आलेल्या शेळ्यांच्या कळपावर रविवारी भल्या पहाटे बिबट्याने हल्ला चढविला. त्यात चार शेळ्यांचा जागेवरच फडशा पाडण्यात आला तर एक शेळी गंभीर जखमी झाली होती. नागरिकांनी आरडाओरड केल्यानंतर बिबट्याने तेथून पळ काढला. बिबट्या गावात घुसून पाळीव प्राण्यांना भक्ष्य करीत असल्याने गावात दहशतीचे वातावरण पसरले होते. बिबट्याला जेरबंद करावे, अशी मागणी या भागातील नागरिकांनी केली होती.

दरम्यान, वन विभागाच्या पथकाने गणोर, आंबापूर भागात रात्रीची गस्त करुन दोन वेगवेगळ्या ठिकाणी पिंजरे लावले होते. त्यातील एका पिंजऱ्यात एका बिबट्याला पकडण्यात वन विभागाला यश आले आहे. बिबट्याला जेरबंद करुन शहादा येथील वनविभागाच्या कार्यालयात आणण्यात आले असून वैद्यकीय तपासणी करुन शासकीय नियमानुसार बिबट्याला वरिष्ठांचा मार्गदर्शनानुसार जंगलात सोडण्यात येणार असल्याचे तोरणमाळ येथील वन परिक्षेत्र अधिकारी एम.बी.चव्हाण यांनी सांगितले.

## सिटी लिंकच्या कर्मचाऱ्यांनी आंदोलन घेतले मागे

### पालकमंत्री दादाजी भूसेंची शिष्टाई यशस्वी

**नाशिक । प्रतिनिधी**

नाशिक शहराची वाहतूक वाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिटी लिंक बस कर्मचाऱ्यांनी काम बंद आंदोलन पुकारल्याने नाशिककरांना मोठ्या गैरसोयीला सामोरे जावे लागले, हे लक्षात घेवून नाशिक जिल्हा पालकमंत्री दादाजी भुसे यांनी मध्यस्थी करत अखेर तोडगा काढला आहे. पालकमंत्री दादाजी भुसे यांनी महापालिका आयुक्त, संबंधित ठेकेदार तसेच आंदोलकांच्या प्रतिनिधींशी दूरध्वनीवरून चर्चा करत तोडगा काढण्याच्या सूचना दिल्यात. त्यानुसार आंदोलकांनी देखील पालकमंत्री यांच्याशी झालेल्या चर्चेतून मार्ग काढत आंदोलन मागे घेतले.

गेल्या दोन ते अडीच वर्षांपासून सर्वसामान्य चाकरमान्यांची वाहतूक वाहिनी म्हणून सिटी लिंक बसेसला ओळखले जात आहे. नाशिक शहरातील विविध ठिकाणी सिटी लिंक मार्फत अत्यंत कमी दरात वाहतूक व्यवस्था नाशिक महापालिकेतर्फे करण्यात आली आहे. मात्र सर्वसामान्य नागरिकांचा प्रवास अत्यंत कमी पैशांमध्ये सुखकर करणाऱ्या सिटीलिंक बसेसच्या कर्मचाऱ्यांचे वेतन तीन महिन्यांपासून थकीत असल्याने संतप्त झालेल्या या कर्मचाऱ्यांकडून काम बंद आंदोलन पुकारण्यात आल्यामुळे नाशिककरांचे हाल झाले. याची दखल घेत पालकमंत्री भुसे यांनी कुठल्याही परिस्थितीत बससेवा सुरू करा तसेच थकीत वेतनबाबत तसेच इतर मागण्यांबाबत सकारात्मक निर्णय घेत आंदोलकांना देखील दिलासा देण्याच्या सूचना केल्याने अखेर हे आंदोलन मागे घेण्यात आले.

आंदोलनामुळे नाशिककरांची गैरसोय झाली. हे आंदोलन मागे घेतल्याने नाशिककरांना दिलासा मिळाला आहे. दोन दिवसापासून शहरातील बससेवा कोलमडली होती यावर तोडगा काढण्यासाठी पालकमंत्र्यांनी हस्तक्षेप करत संप मागे घेण्याची शिष्टाई यशस्वी केल्याने नागरिकांनी आभार मानले आहेत.

या बैठकीला प्रभारी मनपा आयुक्त तथा प्रशासक भाग्यश्री बानायत, सिटीलिंकचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रदिप चौधरी, मुख्य महाव्यवस्थापक बाजीराव माळी, महाव्यवस्थापक मिलींद बंड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी प्रिती खारतुडे, मॅक्स डिटेक्टीव्ह ॲन्ड सिक्युरीटी सर्व्हिसेस कंपनीचे व वाहकांचे प्रतिनिधी उपस्थित होते. यावेळी ३१ जुलै रोजी पगार तसेच इतर मागणीवर बैठक घेवून अंतिम निर्णय घेण्यात येईल असाही अंतिम निर्णय घेण्यात आला.

## धुळे जिल्हा बुद्ध विहार समन्वय समिती ची बैठक संपन्न

**धुळे । प्रतिनिधी**



धुळे जिल्हा बुद्ध विहार समन्वय समितीची आढावा बैठक संदेशभूमी, धुळेच्या सभागृहात घेण्यात आली. अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष प्रा. विलास चव्हाण हे होते. बैठकीत विविध विषयांवर चर्चा करण्यात आली .

मनोहर मोहिते यांनी सांगितले की, बौद्ध संस्कार समाजात रुजवित असतांना आपण हिंदू संस्कारांपासून दूर राहिले पाहिजे. त्यासाठी बौद्ध संस्कार प्रसारित करण्यासाठी प्रयत्न करणे आवश्यक आहे. तर प्रा. डॉ. संजय ढोडरे यांनी सांगितले की, समितीमार्फत समाजातील विद्यार्थ्यांसाठी विविध स्पर्धा परीक्षा व निबंध स्पर्धांद्वारे विद्यार्थ्यांच्या सुप्त शक्तीला चालना देणे गरजेचे ठरेल. राजेंद्र थोरात यांनी धम्म सहल संकल्पना मांडून याविषयी मार्गदर्शन केले. यासाठी बी. बी. साळवे, सिद्धार्थ जाधव, अशोकराव खैरनार, मेघा गायकवाड मॅडम यांनी सहलीचे आयोजनाची जबाबदारी स्वीकारली. सर्व सन्माननीय सदस्यांनी समितीचे आजीव सभासदत्व स्वीकारावे असे आवाहन करण्यात आले. त्याचबरोबर सभासद संख्या वाढविणे गरजेचे आहे, असे नमूद करण्यात आले.

सुभाष निकुंबे यांनी समिती मार्फत गोरगरीब विद्यार्थ्यांसाठी तांत्रिक कोर्सेसचे नियोजन करून सुशिक्षित व बेरोजगार तरुणांना व्यवसाय मिळण्यासाठी मदत करण्याविषयी मत मांडले. प्रा. डॉ. शहाजी शिंदे यांनी समन्वय समितीने दृश्य स्वरूपातील कार्य करुन इतर संस्थांना सहकार्य करणे गरजेचे आहे, शाश्वत कार्य होणे गरजेचे आहे, असे नमूद केले. कल्पनाताई लोंढे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन महिला सहभाग वाढवून धम्मचळवळ गतिमान करणे आवश्यक आहे, असे प्रा. विलास चव्हाण यांनी सांगितले. व्ही. टी. गवळे यांनी पाली भाषा परीक्षांवर लक्ष केंद्रित करुन आपण समाजातील मुलामुलींसाठी विविध नवोपक्रम राबवू शकतो, असे नमूद केले. डॉ. सुरेश बिऱ्हाडे व इंजीनियर जी. बी. पवार यांनी राज्यस्तरीय समन्वय समितीची ध्येय धोरणे सांगितली. विविध विषयांवर सांगोपांग, विधायक चर्चा करण्यात आली. बैठकीचे संयोजन राजेंद्र थोरात, किशोर शेजवळ, सुरेश बिऱ्हाडे यांनी केले. शेवटी प्रा. विलास चव्हाण यांनी बैठकीचा समारोप केला. बैठकीस आनंद सैंदाणे, अनंत भामरे, संजय निकुंबे, प्रा. डॉ. संजय ढोडरे, पी. यु. पवार, सिद्धार्थ जाधव, पुष्पा शिरसाठ, मेघा गायकवाड, चतुर चित्ते, के. एम. शेजवळ, मनोहर मोहीते, डी. एच. लोंढे, अशोक खैरनार, भीमराव कढरे, व्ही. टी. गवळे आदी मान्यवर मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

शारदा शैक्षणिक व सामाजिक संस्था
Admission Open
**विद्याधन महाविद्यालय, वलवाडी, धुळे**
NAAC Accredited 'B' Grade – वडेल रोड, एमएसईबी जवळ, वलवाडी, धुळे
कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापिठ जळगाव, कोड नं. 200111
B.Sc. | B.C.A | M.M.S./M.C.M.
डिप्लोमा उत्तीर्ण झालेल्यांना S.Y.B.Sc. ला प्रवेश SC/ST साठी मोफत
संपर्क: प्रा.ललिता निकम: 8862044791, प्रा.जागृती पाटील: 7887934365
यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापिठ, नाशिक कोड नं. 5299A
B.A., B.C.A, B.Sc., M.A., M.C.A., M.B.A.
सर्व अभ्यासक्रमांना सत्यप्रतीवर (झेरॉक्स) प्रवेश मिळेल.
प्रा.हर्षल पाटील: 9421283577, श्री.नितेश पाटील: 9922116438,
प्रा.भूषण पाटील: 7709100798
ज्ञानगंगा घरोघरी
शासन मान्यताप्राप्त एम.एस.बी.टी.ई. मुंबई संलग्नीत कोड नं.2053
P.G.D.M.L.T. Advanced Diploma in Medical Laboratory Technology
पात्रता – बीएस्सी केमेस्ट्री, बॉटनी, झुऑलॉजी, मायक्रो बायोलॉजी/बी.फार्म/बी.ए.एम.एस./बी.डी.एस./एम.बी.बी.एस.
संपर्क : प्राचार्य डॉ.के.बी.पाटील – 9422288518,
सौ.शारदा पाटील – 9423496344
प्राचार्य डॉ.आर.बी.पवार: 9420375735,
प्रा.डॉ.योगेश बोरसे: 9423378936, श्री. हर्षल पाटील: 9421283577





# ‘स्थायी’त विकासकामांपेक्षा वाहन खरेदीच्या मुद्यावरच चर्चा











धुळे। महिंदळे

धुळे । नगरसेवक म्हणून निवडून येवून आम्हाला साडेचार वर्ष झाली. हद्दवाढ गावांकडे पुर्णपणेदुर्लक्ष झाले आहे. निवडणुकीला अवघे पाच महिने बाकी आहे. आता शेवटच्या पाच महिन्यात तरी हद्दवाढ गावांना न्याय द्या,असे म्हणत हद्दवाढ गावातील नगरसेवक किरण अहिरराव यांनी प्रशासनाचे कान टोचले. स्थायी समितीच्या आजच्या साप्ताहिक सभेच्या सुरुवातीला प्रथम महापौर भगवान करनकाळ यांच्या सौभाग्यवती मिनाबाई करनकाळ आणि भाजपा नेते मनोहर भदाणे यांच्या मातोश्री सुशिलाबाई भदाणे यांचे निधन झाल्याने त्यांना श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या शहर जिल्हाध्यक्षपदी गजेंद्र अंपळकर यांची निवड झाल्याने सभापती सौ.किरण कुलेवार यांनी अभिनंदनाचा ठराव मांडला.तो मंजुर करण्यात आला. स्वच्छ भारत अभियांनातर्गत नविन वाहन खरेदी करण्याच्या विषय क्र.११७ वर सभागृहात चर्चा सुरु होती. हे वाहन कचरा डेपोच्या ठिकाणी वापरले जाणार होते. नगरसेवक किरण अहिरराव म्हणाले की,या दोन टिपर वाहनांचा उपयोगआमच्या प्रभागात होवू द्या, गेल्या साडेचार वर्षात कचरा संकलनासाठी माझ्या प्रभागातील महिंदळे शिवारात एकदाही ट्रॅक्टर आले नाही. या गाड्यातरीप्रभागात येवू द्या,३१ मार्च पूर्वी वाहन खरेदी करणे गरजेचे होते,अन्यथा निधी परत गेला असता असे शासन निर्देश आहे. असे प्रशासनाचे म्हणणे आहे. तर मग माझ्या प्रभागातील किमान साडेचार वर्षानंतर तरी कचरा उचलण्याबाबत काही शासन निर्देश आहेत का? असा सवाल करत अहिरराव यांनी महापालिका प्रशासनाला चिमटा काढला. वाहन खरेदीच्या विषयावर साबीर शेख म्हणाले की, हि वाहने खरेदी करतात, परंतु डॉग व्हॅनचे काय? सभापती किरण कुलेवार ह्या सदस्य असताना नेहमी मोकाट कुत्र्यांचा प्रश्न मांडायच्या. आता काय झाले? गेल्या दोन वर्षांपासून या प्रश्नावर टोलवा टोलवी सुरु आहे. साबीर शेख यांच्या प्रश्नाला उत्तर देताना अतिरिक्त आयुक्त सनेर म्हणाले की, कुत्र्यांच्या निर्बिजीकरणाच्या प्रश्नामध्ये काही तांत्रिक अडचणी आहेत, परंतु कुत्र्यांचा बंदोबस्त विनामुल्य होणार आहे, काही स्वयंसेवी संस्था स्वतः भटक्या कुत्र्यांचा बंदोबस्त करणार असल्याचे सनेर म्हणाले. विषय क्र.१२० हा महापौरांच्या वाहन खरेदीचा होता. त्यावर माजी सभापती सुनिल बैसाणे म्हणाले की, महापौरांसोबतच उपमहापौर, स्थायी समिती सभापती आणि मनपातील काही अधिकार्यांना वाहनांची गरज आहे. त्यामुळे सर्वांसाठी वाहन खरेदी करायला हवे. त्यावर सभापती सौ.कुलेवार यांनी महापालिकेची आर्थिक परिस्थिती पाहुन निर्णय घेवू असे सांगितले.

संकलन : दिपक वाघ

CMYK

दैनिक
लक्ष महाराष्ट्र





# भाजपा धुळे महानगर जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांचे जल्लोषात स्वागत
















धुळे । धुळे महानगर जिल्हाध्यक्षपदावर गजेंद्र अंपळकर विराजमान झाले आहे. त्यांचे धुळे शहरात जल्लोषात स्वागत देखील करण्यात आले. यावेळी माजी उपमहापौर प्रभाग क्र १४ नगरसेविका कल्याणी अंपळकर, सतिश अंपळकर, धुळे मनपाच्या सभागृह नेत्या भरती माळी मोठ्या प्रमाणात नागरिक यावेळी उपस्थित होते. भाजपाचे नुतनजिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर यांना राजकारणाचा दांडगा अनुभव देखील आहे. त्यांच्या वहिनी कल्याणी अंपळकर ह्या माजी उपमहापौर तथा नगरसेविका आहेत. त्यामुळे गजेंद्र अंपळकरांना राजकारणासह महापालिकेची खडानखडा माहिती आहे. गजेंद्र अंपळकर यांनी आपल्या हर हर महादेव विजय व्यायामशाळेच्या माध्यमातून उत्कृष्ट मल्ल घडविण्याचे कार्य अविरतपणे चालविले आहे. शिवाय प्रत्येकाच्या सुखा-दुःखात ते हिरीरीने धावून जातात. सण-उत्सवांमध्येही त्यांचा पुढाकार असतो. कोणतेही पद नसताना त्यांनी नागरिकांच्या अनेक समस्या सोडविल्या आहेत. सक्षम, प्रभावी व संघटन कौशल्य असलेले नेतृत्व त्यांच्या रुपाने भाजप कार्यकर्त्यांना लाभले आहे. श्री.अंपळकरांकडे जिल्हाध्यक्षपदाची धुरा दिल्याने शहरात भाजपाची ताकद आणखी वाढणार असून पक्ष संघटन वाढीसही मोठी मदत होणार आहे. आगामी काळात होणार्या महानगरपालिका, विधानसभा निवडणुकीत त्यांची भुमिका मोलाची ठरणार आहे. भाजपाने त्यांच्यासारख्या प्रामाणिक, निष्ठावंत कार्यकर्त्याला जिल्हाध्यक्षपदी विराजमान करुन त्यांना खर्या अर्थाने न्याय दिल्याची भावना कार्यकर्त्यांसह सर्वसामान्यांतून व्यक्त होत आहे.

संकलन : दिपक वाघ